ऑगस्ट, २०२५

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद




*अतिथी संपादक*

**ॲड. आशिष शेलार**

मंत्री, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान


महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
छत्रपती शिवाजी महाराजांचे
१२ किल्ले युनेस्को जागतिक वारसा नामांकन
यादीत समाविष्ट झाल्याबद्दल
महाराष्ट्रातील जनतेचे हार्दिक अभिनंदन!
शिवनेरी
राजगड
रायगड
प्रतापगड
पन्हाळा
साल्हेर
लोहगड
खांदेरी
सुवर्णदुर्ग
विजयदुर्ग
सिंधुदुर्ग
जिंजी
महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा!
आपल्या गौरवशाली इतिहासाची जागतिक स्तरावर घेतलेली दखल,
ही सर्व मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे.
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
एकनाथ शिंदे
अजित पवार
ॲड. आशिष शेलार

## ६ सर्वगुणसंपन्न छत्रपती शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कुलदैवत असलेल्या तुळजाभवानी मातेवर महाराजांची अपार श्रद्धा होती. संकटसमयी ते मातेसमोर नतमस्तक होत असत. तुळजाभवानी मातेचे ते उपासक होते. आई तुळजाभवानी इतकीच त्यांची जिजामातेवरही श्रद्धा होती. प्रत्येक मोहिमेवर जाताना ते जिजामातेचा आशीर्वाद घेत असत व मोहिमेवरून परत आल्यावर सुद्धा त्यांचे दर्शन आवर्जून घेत असत. ते मातृभक्त होते. ते त्यांना गुरू मानत असत.

## १२ छत्रपती शिवरायांची पराक्रम स्थळे युनेस्कोच्या व्यासपीठावर!

महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहास, पराक्रम आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गडकिल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.

## १६ छत्रपती शिवरायांच्या कालखंडातील शस्त्रे

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजेच एक असाधारण व बुद्धिमान राजा अशी जागतिक कीर्ती ही फक्त लढाई आणि साम्राज्यविस्तार एवढीच नसून, यासोबत महाराजांच्या अभ्यासू आणि संशोधनात्मक विकसनशील धोरणाचे प्रमाण आहे. दुर्गनिर्मिती, किल्ल्यांची पुनर्बांधणी, व्यापार व शेतीविषयक धोरणे यासोबतच शस्त्र निर्मितीचे कारखाने हादेखील त्याचाच भाग आहे.

## २५ शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा'

वारणा आणि पंचगंगेची उपनदी असलेल्या कासारी नदीचा जलविभाजक असलेल्या सह्याद्रीच्या पूर्व दिशेने पसरलेल्या रांगेच्या उंच डोंगरावर बसलेला पर्नाल पर्वत म्हणजेच पन्हाळा. पन्हाळा हा पावनगड आणि पन्हाळा असा जोडकिल्ला आहे. समोरच दख्खनचा राजा म्हणून ओळखला जाणारा जोतिबाचा डोंगर याच रांगेत आहे. ईशान्येला पसरलेले वारणेचे विस्तीर्ण खोरे, पूर्व आणि दक्षिणेकडे पंचगंगा, कासारीचे खोरे आणि कोल्हापूर परिसर, तर पश्चिमेकडे विशाळगडपर्यंतचा संपूर्ण परिसर नजरेच्या एका टप्प्यात येणारा हा किल्ला.

## २८ छत्रपती शिवाजी महाराज : शिक्षण आणि संस्कार

छत्रपती शिवरायांच्या शिक्षणाचा श्री गणेशा वयाच्या सातव्या वर्षी सुरू झाला होता. महाराजांची बुद्धी कुशल असल्यामुळे लिपीव्यवस्था त्यांनी जलद व उत्तमरीत्या आत्मसात केली. शिक्षक सांगण्यापूर्वीच ते पुढचा वर्ण लिहीत असत. त्यांच्या वेगवान शिकण्याने शिक्षक प्रभावित झाले. शहाजीराजांनी मंत्र्यांच्या मुलांसोबतच त्यांचे शिक्षण घडवून आणले. युद्धांत गुंतलेले असूनही शहाजीराजे पुत्राच्या जडणघडणीत जागरूक राहिले. भावी स्वराज्यासाठी योग्य प्रशिक्षण देणे हेच त्यांचे ध्येय होते.

## ३४ शिवराज्याभिषेक दिन मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय

६ जून १६७४ – हा दिवस महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेलेला एक विलक्षण क्षण होता. याच दिवशी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक संपन्न झाला. शतकानुशतकं परकीय आक्रमणांनी आणि जातीय विषमतेने पिचलेल्या समाजाच्या पुनर्जन्माचा क्षण...


सर्वगुणसंपन्न छत्रपती शिवाजी महाराज ६
छत्रपती शिवराय नावाचं गारूड ८
छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, कर्नाटक १०
शिवरायांची राजमुद्रा व पत्रव्यवहार ११
छत्रपती शिवरायांची पराक्रम स्थळे युनेस्कोच्या व्यासपीठावर! १२
शिवरायांचे दुर्गवैभव आता जागतिक ठेवा! १४
छत्रपती शिवरायांच्या कालखंडातील शस्त्रे १६
बेल धरण २४
शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा' २५
छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण आणि संस्कार २८
महाराज आज तुम्ही असते तर... ३०
युवकांच्या हातात स्वराज्याचा वारसा ३२
शिवराज्याभिषेक दिन मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय ३४
मराठी मुलखाचा पहिला अभियंता! ३५
शिवकालीन चलन ३५
जिंजी : भारताचा अभेद्य किल्ला ३६
शिवप्रेमी अजय भोसले यांनी साकारलेला गडकिल्ला ३८

वर्ष ३ रे । अंक ५ । ऑगस्ट, २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# छत्रपतींचे तेज : प्रेरणेचा अखंड दीप

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या या विशेषांकामध्ये आपण त्यांच्या कर्तृत्वाच्या विविध अंगांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. युनेस्कोच्या वारसास्थळांमध्ये समाविष्ट असलेल्या बारा गडकिल्ल्यांचा गौरव, महाराजांचे जलधोरण, लढायांमध्ये वापरले जाणारे शस्त्रास्त्र यांची माहिती देताना त्यांच्या दूरदृष्टीचा आणि अद्वितीय लष्करी कुशलतेचा प्रत्यय वाचकांना मिळणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी माता जिजाऊंच्या मार्गदर्शनातून प्रचंड धैर्य, आत्मविश्वास व न्यायप्रियता अंगीकारली. त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वामुळे ते सर्वगुणसंपन्न शासक म्हणून ओळखले जातात.

आजच्या तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा जतन करणे हीच खरी जबाबदारी आहे. किल्ले, शस्त्रास्त्रांचा वारसा किंवा धोरणात्मक तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करून, त्यांनी दिलेला संदेश आधुनिक समाजात रुजवणे ही काळाची गरज आहे.

किल्ल्यांची रचना, गडकोटांचे बांधकाम, कौशल्यपूर्ण आराखडा, जलव्यवस्थापन, प्रशासनविषयक दृष्टिकोन या किंवा अशा अन्य बाबतीतही छत्रपती शिवाजी महाराज यांचा अभ्यास सूक्ष्म असे.

या विशेषांकाच्या औचित्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील अस्तित्वात असलेल्या बाबींचा परामर्श घेण्याचा प्रयत्न या विशेषांकात करण्यात आला आहे. शिवकालीन गडकिल्ले, शस्त्रे, पत्रव्यवहार, चलन, जलव्यवस्थापन याचा आढावा घेण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेज आणि आदर्श आजही आपल्या जीवनाला दिशा देतात. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हेच या विशेषांकाचे खरे यश ठरेल.

**- ॲड. आशिष शेलार**
(मंत्री सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान.)

# छत्रपतींचे दुर्गवैभव : एक जागतिक ठेवा

छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव उच्चारले की, प्रत्येक मराठी माणसाच्या शिरांत रक्त सळसळू लागते, मान अभिमानाने उंचावते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पराक्रम, त्यांचा राज्यकारभार आणि त्यांच्या प्रेरणेने उभारलेले गडकिल्ले हे केवळ महाराष्ट्राचे नाहीत, तर संपूर्ण जगाचे अनमोल ठेवे आहेत. आज युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांचा समावेश झाला आहे, ही बाब महाराष्ट्रासाठी नाही, तर भारतासाठीही अभिमान आणि प्रतिष्ठेची बाब ठरली आहे. कारण हे दुर्ग हे केवळ दगडांचे बांधकाम नाही, तर ते स्वराज्याचे जिवंत स्मारक आहेत.



छत्रपती शिवरायांचे दुर्ग स्वराज्याच्या प्रत्येक श्वासाची साक्ष देणारे जिवंत स्मारक आहेत. रायगड, प्रतापगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, तोरणा, राजगड यांसारख्या गडांवर उभे राहिले की, आपण इतिहासाच्या प्रवाहात थेट प्रवेश करतो. प्रत्येक तटबंदी, प्रत्येक बुरूज, प्रत्येक तोफेची जागा आपल्याला तेथील युद्धांच्या थरारक दृश्यांची आठवण करून देते. पन्हाळ्याच्या तटांवरील दगडी शिल्पे, किल्ल्यावरील शिलालेख हे केवळ स्थापत्यकलेचे उदाहरण नाही, तर स्वराज्याच्या दृढतेचे पुरावे आहेत.

महाराज फक्त रणांगणातील पराक्रमी नव्हते, तर ते दूरदर्शी समाजधुरीण होते. पाणीटंचाई ही समस्या त्या काळीही होती. शिवरायांनी बांधलेली धरणे, टाक्या, तळी आणि बंधारे यामुळे जनतेला पाण्याचा पुरवठा सुरळीत झाला. पावणेचारशे वर्षांपूर्वी उभारलेले हे जलव्यवस्थापन आजच्या तंत्रज्ञानालाही मार्गदर्शक ठरणारे आहे. पर्यावरणाशी सुसंगत आणि जनतेच्या गरजांशी जुळवून घेतलेली ही नीती आपल्याला दाखवते की, शाश्वत विकासाचा मार्ग महाराजांनी याआधीच दाखवून दिला होता.

आज छत्रपती शिवाजी महाराज यांचे संभाव्य हस्ताक्षर असलेली काही पत्रे इतिहासतज्ज्ञांच्या हाती आली आहेत. या हस्ताक्षरांतून आपल्याला त्या काळातील भाषाशैली, प्रशासनशैली आणि महाराजांचा स्पष्ट दृष्टिकोन यांची झलक पाहायला मिळते. रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी हे तर तमाम महाराजांच्या भाविकांसाठी श्रद्धास्थान आहे. त्या समाधीचे दुर्मीळ छायाचित्र पाहताना छाती आपोआप भरून येते. ही स्थळे केवळ ऐतिहासिक नाहीत, तर आध्यात्मिक ऊर्जा देणारी आहेत.

शिवरायांचे खरे वैभव हे त्यांच्या प्रशासनात, न्यायनीतीत आणि जनतेप्रति असलेल्या बांधिलकीत आहे. स्त्रियांप्रति आदर, धर्मनिरपेक्षता, दुर्बलांच्या रक्षणाची हमी हे शिवसंस्कार आजच्या समाजासाठी तेवढेच आवश्यक आहेत, जितके स्वराज्यासाठी होते. युवकांनी या संस्कारांतून प्रेरणा घ्यावी, ही खरी काळाची गरज आहे. दुर्गांचे संरक्षण केवळ पर्यटनासाठी नसून ते भावी पिढीला हे संस्कार देण्यासाठी आहे.

आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान प्राप्त झाले आहे. या निर्णयामुळे जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाला नवी ओळख मिळणार आहे. या वारसास्थळांची प्रसिद्धी अधिक वेगाने होऊन महाराष्ट्राचे सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होण्यास हातभार लागणार आहे.

पर्यटकांना महाराष्ट्रातील दुर्गसंस्कृती, स्थापत्यकला, शिवकालीन वारसा व ऐतिहासिक परंपरा यांचा जवळून परिचय होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले हे केवळ महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे प्रतीक नाहीत, तर ते सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीचेही प्रभावी साधन ठरणारे आहेत. इतिहास हा केवळ गौरवशाली भूतकाळ नसतो, तर तो सामाजिक परिवर्तनाचा मार्ग, आर्थिक प्रगतीचे साधन आणि सांस्कृतिक एकतेचे प्रतीक असतो. छत्रपती शिवरायांच्या स्मरणार्थ हा विशेषांक काढण्यात आलेला आहे, हा अंक आपणास नक्की आवडेल, याची खात्री आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# सर्वगुणसंपन्न छत्रपती शिवाजी महाराज

**डॉ. रमेश नारायण**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कुलदैवत असलेल्या तुळजाभवानी मातेवर महाराजांची अपार श्रद्धा होती. संकटसमयी ते मातेसमोर नतमस्तक होत असत. तुळजाभवानी मातेचे ते उपासक होते. आई तुळजाभवानीइतकीच त्यांची जीजामातेवरही श्रद्धा होती. प्रत्येक मोहिमेवर जाताना ते जीजामातेचा आशीर्वाद घेत असत व मोहिमेवरून परत आल्यावरसुद्धा त्यांचे दर्शन आवर्जून घेत असत. ते मातृभक्त होते. ते त्यांना गुरू मानत असत.

## चरित्र

गणेश शास्त्री लेले यांनी 'शिवचरित्र' या महाकाव्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वभावाचे वर्णन केले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज हे प्रजाहितदक्ष राजा होते, पुढे ते म्हणतात, काम क्रोधादि रिपुंच्या आहारी छत्रपती शिवाजी महाराज कधी गेले नाहीत, त्यांनी नीतीमार्ग कधीही सोडला नाही, अपराध्याला मग तो कुणीही असो त्याला योग्य शासन केल्याशिवाय ते कधी राहिले नाहीत. महाराजांच्या ठायी केवळ प्रजेविषयीच नाही, तर सर्वांविषयी समभाव होता. ते म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराजांजवळ निष्पक्षपातीपणा होता, त्यांच्याजवळ आपपरभाव नव्हता. ते प्रजाहितदक्ष राजा होते, असे ते महाकाव्यात म्हणतात.




## स्त्रियांविषयीचे मत

स्त्रियांविषयी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनात देवीइतकाच आदर होता. दिल्या गेलेल्या वर्तणुकीवरून आपल्या संस्कृतीचा दर्जा ठरत असतो असे त्यांचे मत होते. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची कथा तर सर्वश्रुत आहे. तसेच उंबरखिंडीच्या लढाईत कारतलबखान पराभूत झाला, तेव्हा त्याच्याबरोबर 'रायबाधन' पदवी असलेल्या रणरागिणी वऱ्हाडातल्या उदारम देशमुख यांच्या बायकोला महाराजांनी त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना सुखरूप त्यांच्या घरी पाठविले. कर्नाटकहून परत येत असताना बेलवाडीच्या किल्ल्याची मालकीण सावित्रीबाई देसाई हिने महाराजांच्या सैन्याशी निकराचा लढा दिला; पण त्यात त्यांचा पराभव झाला, तेव्हा सावित्रीबाईंना जेरबंद करून महाराजांसमोर आणून उभे केले. महाराजांनी त्यांना वस्त्रालंकार देऊन त्यांचा गौरव केला व त्यांना दोन गावे इनाम म्हणून दिलीत; पण त्यांना कोणतीही शिक्षा त्यांनी केली नाही. त्यांच्याजवळ स्त्रीदाक्षिण्य असल्याचा तो दाखला म्हणता येईल. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना व स्त्रियांच्या चारित्र्यास कलंक लावणाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज जबर शिक्षा करीत असत. रांझा गावचे बाबाजी भिकाजी गुजर पाटील यांचे महाराजांनी कोपरापासून हात व गुडघ्यापासून पाय तोडण्याची शिक्षा दिली होती. जेणेकरून पुन्हा कोणाची कोणत्याही स्त्रीवर अत्याचार करण्याची हिंमत होणार नाही, अशी जरब त्यांनी बसविली होती.

तंजावरच्या सरस्वती महाल, तंजावर, ग्रंथालय येथे एक शिवकालीन हस्तलिखित वही मिळाली आहे. त्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एक अभंग आहे. त्यावर सातारकरस्त शहाजीराजे यांचे पुत्र शिवाजीराजे यांचा अभंग अशी नोंद आहे. तो अभंग असा आहे. :-

*नासिवंत सुखासाठी*
*अंतरला जगजेठी*
*नहि नहि याते गोडी*
*लक्ष चौऱ्याशीची जोडी*
*मनुष्य जन्म गेल्यावारे*
*काय करशील बारे*
*शिवराजे संगे जनाम्या तो सोडिली वासना*

छत्रपती शिवाजी महाराज श्रीशैलम येथे होते, तेव्हा सर्वकाही त्याग करावे, अशी विरक्तीची भावना त्यांच्या मनात दाटून आली, तेव्हा त्यांनी हा अभंग रचला असावा.

श्री. परमानंद त्यांच्या श्रीशिवभारत या शिवचरित्रात म्हणतात,
नियोजयन्स सर्वत्र दृशं प्रणिधिरुपिणीम् ।
पश्वत्यवहित : सर्व शिवो बाह्यं तथान्तरम् ।।१।।

शिवाजी महाराज स्वराज्यातील सर्व गोष्टी दक्षतेने पाहत असत.
कवी भूषण म्हणतात,
कुंद कहा पयवृंद कहा,
अरुचंद कहा, सरजा जस आगे.

याचा अर्थ असा की, कुंद कळ्यांची शुभ्रता, दुधाची आणि आकाशातील पौर्णिमेच्या चंद्राची धवलता ही शिवरायांच्या यशासमोर फिकी आहे.




झाली होती. त्याप्रमाणे त्यांनी तसे प्रयत्नही केले.

मुलकी व्यवस्थेमध्ये १) मिरासदारी, वतनदारी, जहागिरी, यांसारखी वतने रद्द करून अंमलदारांना कडक शिस्त लावली, २) योग्य ती सरकारी खाती निर्माण केली, ३) शेतकऱ्याबाबत त्यांच्या मनात आस्था होती, म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देण्याची योजना आखली. पडीक जमिनी लागवडीलायक व बागाईत करून शेतकऱ्याची आर्थिक स्थिती पर्यायाने राज्याची आर्थिक स्थिती मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला. शेतीत सुधारणा करून शेतकऱ्यांना बैल, गुरेढोरे दिली. 'शेतकरी सुखी, तर राज्य सुखी'अशी त्यांची भूमिका होती, त्यासाठी त्यांनी व्यापार-धंद्यालाही प्रोत्साहन दिले व आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ४) लोकांना न्याय मिळावा म्हणून त्यांनी न्यायाधीश नेमले. ५) प्रजेच्या संपत्तीला कोणीही हात लावू नये अशी ताकीद त्यांनी दिली होती. ६) अन्न, वस्त्र, निवारा, पाणी याची त्यांनी व्यवस्था केली. ७) कलावंत, विद्वान, शास्त्रज्ञ यांना आश्रय दिला आणि लष्करी व्यवस्थेत जातीने लक्ष देऊन तेथे चढत्या क्रमाने अधिकारी नेमले, उदा. नाईक, अंमलदार, हवालदार, जुमलेदार, सरसेनापती, अशा नेमणुका करून त्यात शिस्त आणली.

श्री. रामदास म्हणतात,
निश्चयाचा महामेरु । बहूत जनांसी आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।

महाराजांच्या काळातील महान व्यक्तिमत्त्वांनी महाराजांबद्दल व्यक्त केलेल्या या भावना आहेत. यातून महाराजांचे महान व्यक्तिमत्त्व आधोरेखित होत आहे. तथापि स्वकियांशी लढण्यात महाराजांची शक्ती खर्च झाली, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. तथापि महाराज सर्व प्रकारच्या संकटातून गरुड भरारी घेत असत.

## संगठन कौशल्य

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अंगी जबरदस्त संगठन कौशल्य होते. मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी हे कौशल्य अमलात आणले. आमचाच देश, आमचाच पैसा, आमचीच भूमी आणि स्वतःचेच खाऊन सेवा का म्हणून करावी? या विचाराने ते अस्वस्थ झाले होते. त्यासाठी एकत्र येऊन लढा देणे गरजेचे होते हे त्यांना जाणवले व त्यांनी जिवाला जीव देणारे मावळे उभे केले.

## उत्तम प्रशासक

छत्रपती शिवाजी महाराज हे बहुजनांचे आश्रयदाते होते, ते उत्तम प्रशासक होते. मुलकी सेवा व संरक्षण व्यवस्था यावर त्यांचा कटाक्ष होता. कडक शिस्तीत राज्यकारभार करावा या मताचे ते होते. तसेच त्यांना हेही जाणवले की, प्रसंगी शत्रूशीसुद्धा सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून स्वराज्याची घडी उत्तम बसवता येऊ शकते. याची त्यांना खात्री




छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या बाहेरही अनेक राजांशी मैत्रीचे संबंध ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा आग्र्याला गेले, तेव्हा उत्तर भारताशी संपर्क साधून त्यांच्याशी सलोखा निर्माण केला व त्यांनी जनसंपर्क वाढवला. त्यामुळे त्यांचा भारतभर लौकिक वाढला.

# छत्रपती शिवराय नावाचं गारुड

**केशव जाधव**

छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व पिढ्यांचे सर्वकालीन प्रेरणा मंत्र आहेत. केवळ शिवाजी या नावातच एवढे सामर्थ्य सामावले आहे की, या नामोच्चारानेच अंगात वीरश्री संचारते, बाहुस्फुरण पावतात. कुठून आले असेल हे सामर्थ्य? का आले असेल? महाराजांच्या जीवन चरित्राचा बारकाईने अभ्यास केला तर यातले मर्म उलगडू लागते. एखाद्या मंत्रात प्रचंड सामर्थ्य असते असे म्हणतात, कारण तो सिद्ध करण्यासाठी फार मोठी साधना, तपश्चर्या केलेली असते. तसेच शिवाजी या नामात जे सामर्थ्य सामावले आहे, त्यामागे महाराजांनी उण्यापुऱ्या ५० वर्षांच्या आयुष्यात केलेली महान साधनाच आहे. ही साधना आहे शौर्याची, धैर्याची, संघर्षाची, मुत्सद्देगिरीची, दीनदुबळ्या आणि सामान्य रयतेला आईच्या मायेनं सांभाळल्याची, उद्दाम आणि उन्मत्तांचा अहंकार ठेचून त्यांना दिशा दाखविण्याची आहे, अबला आणि निराधारांच्या संरक्षणाची आहे, हे वर्णन करण्यासाठी शब्दही थोटके पडतील. कागदाचा विस्तार अनंत होईल, असे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज!




## स्वराज्याचा अंकुर फुलला

एतद्देशीयांचे एक स्वतंत्र राज्य असावे, यासाठी महाराजांच्या आधीच्या काळात काहींनी प्रयत्न जरूर केला. शहाजी राजांचेही ते स्वप्न होते. किंबहुना स्वराज्य ही त्यांचीच प्रेरणा होती. परकीय सत्तेची रयत. दीनदुबळे, अबलांना त्याची फार मोठी किंमत मोजावी लागते म्हणून जिजाऊमाता, या सर्व जाचातून रयतेला मोकळं कर, रयतेचे राज्य स्थापन कर, अशी विनवणी जगदंबेला पदोपदी करत होत्या. निजामशाही नामशेष होत असताना नाइलाजानं शहाजी महाराजांना आदिलशाहीला जाऊन मिळावं लागलं, स्वयंभू राजासारखा मानमरातब देण्याचं आश्वासन आदिलशहानं दिलं होतं. कर्नाटकची जहागिरीही दिली आणि दक्षिणेत स्वयंभू राजासारखेच ते राहिले.

महाराजांचे संपूर्ण आयुष्यच संघर्षमय होते. केवळ संपूर्ण आयुष्यच नव्हे तर जन्माला येण्यापूर्वीपासूनच ते संघर्ष करत होते, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. शिवजन्माच्या वेळीच अंतर्गत संघर्ष उफाळून आला होता. मराठ्यांचे स्वतंत्र हिंदवी राज्य हे शहाजी महाराजांचे स्वप्न होते, तर हे स्वप्न साकारायचंच हा आऊसाहेबांचा प्रण होता. त्यादृष्टीनंच शहाजीराजेंनी महाराजांना आऊसाहेबांसह पुण्यात ठेवलं होतं, आदिलशाही नजरेच्या कक्षेपासून दूर.

स्वराज्य प्रेरणेच्या या रोपट्याचा भव्य दिव्य वटवृक्ष व्हावा म्हणून. आऊसाहेबांचंही शिवबाच्या प्रगतीकडं बारीक लक्ष होतं त्यांची क्षमता सर्वांगांनी फोफावावी यासाठी. रयतेचं खरं सुख-दुःख बाल शिवबांना कळावं म्हणून आऊसाहेबांनी त्यांना मावळ्यांच्या पोरासोरांत मुक्तपणे मिसळायला सोडलं. त्यातूनच शिवबाला सवंगडी आणि स्वराज्याला एकापेक्षा एक नवरत्नं मिळाली. महाराजांवर प्राण समर्पित करण्यास तयार असणारे सेनानी मिळाले. श्रीराम आणि भगवान श्रीकृष्णाच्या गोष्टी सांगून प्रभू रामासारखं मर्यादा पुरुषोत्तम, तर भगवान श्रीकृष्णासारखं चौफेर आणि चाणाक्ष व्यक्तिमत्त्व घडविण्याचे धडे आऊसाहेबांनी दिले, नव्हे तसं बनवलं. म्हणूनच स्वराज्य निर्मितीमध्ये शिवरायांप्रमाणेच आऊसाहेबांचं योगदानही अनन्य साधारण असंच. शहाजी महाराजांनी आपले खासे कारभारी स्वराज्य निर्मिती कार्यासाठी पुण्याला पाठविले होतेच.

स्वराज्याच्या यज्ञाची सुरुवात तोरणा घेऊन झाली. अनेक ज्येष्ठांकडून महाराजांनी राजनीतीचे, युद्धनीतीचे, कूटनीतीचे आणि सर्वसाधारण जीवनाचे ज्ञानकण वेचले आणि स्वराज्याचा प्रगल्भ राजा, चक्रवर्ती सम्राट घडत गेला.

## प्रतापगड मोहीम

महाराजांची भौतिकदृष्ट्या कोणत्याही बाबतीत खानाबरोबर तुलना होऊ शकत नव्हती. अक्राळ-विक्राळ म्हणावा असा धिप्पाड, युद्धनिपुण, अनुभवी, मुत्सद्दी आणि स्वराज्यद्वेष्टा, असा हा अफझल, चाँद बिबीच्या खासा सरदारांपैकी एक. युद्ध केवळ शस्त्राने खेळली जात नाहीत, तर बुद्धीने जिंकली जातात, हे शिवरायांनी त्यांच्या अलौकिक बुद्धीने सिद्ध केले.

या मोहिमेचे नियोजन महाराज खूप आधीपासून करत होते. या काळात त्यांनी खानाचा अंतर्बाह्य अभ्यास करण्यासाठी अत्यंत चतुर हेराची नेमणूक केली होती. खानाच्या आवडी-निवडी, स्वभाव गुण-

दोष, उणिवा आणि त्याचे शौर्य, शारीरिक ठेवण, मानसिक अवस्था याचा इत्यंभूत अभ्यास करण्यात येत होता. खानावर प्रहार करायचा तो इतका जोरदार असेल की, आदिलशाही हादरली पाहिजे, खिळखिळी झाली पाहिजे, एवढी की फिरून ती उभारली जाऊ नये, हे ध्येय होते.

नियोजनानुसार खानाला गाठायचा तो, जिथे वाघही थबकतो, हवेलाही रस्ता काढणे मुश्कील होते आणि पिशाचालाही चकवा मिळतो, अशा जावळीच्या खोऱ्यात. ही खूणगाठ पक्की होती. त्यादृष्टीनं खान मोहिमेपूर्वी जवळपास तीन-साडेतीन वर्षांपूर्वी महाराजांनी जावळीजवळ केली.

तब्बल ४० हजारांची फौज, अनेक तोफा, प्रचंड प्रमाणात संपत्ती खासा १२,००० हशम सोबत घेऊन खानाचा लवाजमा स्वराज्याच्या दिशेने सरकला. महाराजांचे हेर यावर लक्ष ठेवून होते. खानाने स्वराज्यात आत घुसून जास्त लुटालूट, जाळपोळ करू नये म्हणून महाराज तातडीने प्रतापगडावर जायला निघाले. महाराज घाबरलेत आणि ते वाट दिसेल तिकडे पळत सुटलेत, असा कांगावा करायचा होता. कुस्तीचं मैदान होतं जावळी खोरं, हा बेत कधीचाच ठरलेला. हा नावाचा सह्य पर्वत, कमालीचा असह्य असाच. खानाला तर इथंच गाडायचं, त्याच्या बारा हजार खाशा हाशमांसह. आदिलशाहीला एवढे तडे पाडायचे की, ते कधीही भरून येऊ नयेत, आदिलशाही पुन्हा उभीच राहू नये. हा खासा मनसुबा होता. हो ! ते तर एक दिव्यच होतं. थोडीशी कुचराईसुद्धा जीवावर बेतणारी.

खान वाईत पोहोचला. तो तेथेच रमणार हे उघड होतं. वाई हे त्याचं आवडतं ठिकाण. नियोजनाप्रमाणे सारं घडत होतं. तरीसुद्धा स्वराज्यात सामसुमी पसरली होती. ज्येष्ठ मंडळी, जी खानाला अंतर्बाह्य ओळखत होती, अस्वस्थ होती. त्यांच्या चेहऱ्यावरची अस्वस्थता लपून राहत नव्हती. महाराज जगदंबेच्या प्रतिमेपुढे डोळे मिटून बसले होते. त्यांच्या मनपटलावर सिंहवाहिनी जगदंबा संचारू लागली. आई जगदंबा बळ देणार, पाठराखण करणार म्हटल्यावर, कितीबी खानं येऊ द्यात की. प्रत्येक मावळ्याचे बाहू फुरफुरू लागले.मुठी करकचून आवळल्या जाऊ लागल्या.

महाराजांनी स्वतः बहिर्जी नाईकांशी सल्लामसलतीने स्वराज्याच्या सैनिकांचे अत्यंत चतुराईने नियोजन केले. १०० गनिमांना पुरून उरतील अशा एकापेक्षा एक खासा शिलेदारांवर त्यांची जोखीम ठरवून दिली. खानाला मारायचेच आणि प्रसंगी महाराजांसाठी आणि स्वराज्यासाठी मरायचेही अशा निर्धाराने महाराजांचे एकेकाळचे हे सवंगडी सिद्ध झाले होते. शहाजीराजांनी त्यांच्या खास मर्जीतील अत्यंत धूर्त, चाणाक्ष आणि वाणीतून साखर पाझरणाऱ्या पंत बोकीलांना हेजीबीसाठी धाडले होते. खानाचा अहंकार कमालीचा चेतवून त्याला सुस्त करण्याचे काम पंतांनी चोख बजावले होते. विजेप्रमाणे पट्टा चालवणारा चलाख आणि चुणचुणीत जीवा महाला या मुलास बाजींनी हेरून आणले होते. महाराजांनी जीवाचे महत्त्व ओळखून त्याला

## महाराजांचे नियोजन आणि युद्धकौशल्य

महाराजांनी शून्यातून आणि काहीशा विपरीत परिस्थितीत स्वराज्य निर्माण केले. येथील स्थानिकांचे हिंदवी स्वराज्यासारखे स्वत:चे असे काही राज्य असूही शकते, याची कल्पना त्या काळात कोणतेही सरदार करू शकत नव्हते. चार शाह्या आणि मुघल सल्तनत हेच आपले स्वामी, अशी खूणगाठच त्यावेळच्या मराठ्यांसोबत अन्य प्रांतातील एतद्देशीय सरदारांनी बांधली होती. शहाजी महाराजांसारखा क्वचित एखादा स्वयंभू मनाचा राजाच अशी वेगळी वाट चाचपून बघू शकत होता. पित्याच्या मानातील सल समजून महाराजांनी हिंदवी स्वराज्य उभे केले. ते करत असताना इथल्या जनतेला महाराजांनी दिलासा दिला. रयतेचा विश्वास संपादन केला. हे आपले स्वत:चे राज्य आहे आणि ते व्हावे अशी श्रींची इच्छा आहे आणि श्रींच्या इच्छेनेच ते स्थापित आणि संवर्धित होईल, हा विश्वास रयतेला दिला आणि हेच महाराजांच्या यशाचं रहस्य होतं. रयतेला आपल्या राजाबद्दल असीम आस्था, श्रद्धा वाटू लागली. स्वतःच्या सुरक्षिततेचा विश्वास वाटू लागला. राज्यकारभार चालविताना सर्व प्रदेशावर, सर्व स्तरातील रयतेवर त्यांचे बारीक लक्ष असायचे.

वेळेचं भान, कल्पक नियोजन आणि अतिशय सुयोग्य व्यक्तींची अचूक निवड हे महाराजांचे वैशिष्ट्य. उण्या पुऱ्या आयुष्यात अगदी पदोपदी महाराजांनी अनेक राजकीय डावपेच आखले, अनेक युद्धयोजना आखल्या. महाराजांच्या सूक्ष्म नियोजनामुळे बहुतेक सर्वच युद्ध आघाड्यांवर महाराज यशस्वी ठरले. अचानक उद्भवलेल्या विपरीत परिस्थितीमध्ये नियोजन फसलेच, तर महाराजांचा पर्यायी बी आणि कधी-कधी सी प्लॅनही तयार असायचे. क्वचित परिस्थितीत सूक्ष्म नियोजनानुसार घडलेच नाही, तर त्या-त्या वेळी महाराजांचा प्लॅन बी चाललेला असायचा. महाराजांचे नियोजन सध्याच्या मिनिट-टू-मिनिट प्रोग्रामप्रमाणे क्षणाक्षणाचा विचार करून केलेले असावे. आपल्याला सर्वसामान्यतः माहीत असलेले महाराजांच्या जीवनातील समर प्रसंग म्हणजे लाल महालावर स्वारी, सुरतेची लूट, अफझलखान वध, पन्हाळगडाचा वेळा फोडून विशाळगडाकडे प्रयाण, औरंगजेबाच्या नजरकैदेतून आग्र्याहून केलेली सुटका, अशा अत्यंत जोखिमेच्या मोहिमा. याखेरीज कित्येक जीवघेण्या मोहिमा महाराजांनी आयुष्यात राबविल्या. केवळ ५० वर्षांच्या आयुष्यात स्वतंत्र राज्यनिर्मिती - स्वराज्य आणि त्याचा आदिलशाही व मोगल बादशहाच्या छाताडावर नाचत केलेला विस्तार ही काही सामान्य गोष्ट नव्हती. त्यामुळंच जर्मनी, फ्रान्स, इटली, जपान, इस्रायल आदींसारखे अत्यंत प्रगत देश महाराजांच्या युद्धनीतीचा आजही बारकाईने अभ्यास करत आहेत. महाराजांच्या नियोजनाचे, युद्धप्रावीण्याचे हे प्रमाणच म्हणावे लागेल. खरंच आहे. या सर्व मोहिमा जीवघेण्याच होत्या. या मोहिमांमध्ये एका क्षणाचीही उसंत झाली असती, एखादा मावळा जरी लटका पडला असता, तरी संपूर्ण योजनाच फसली असती आणि रवानगी थेट मृत्यूच्या जबड्यात!

अंगरक्षकाच्या ताफ्यात सामील केले. मोहिमेचे अत्यंत सूक्ष्म नियोजन महाराजांनी लावले होते आणि सर्वांनी ती अगदी अचूकपणे पारही पाडली. हर हर महादेवच्या युद्धघोषाने सारा आसमंत दुमदुमून निघाला. असे अकल्पित घडेल याची कोणतीही कल्पना नसल्याने आदिलशाही सैन्य भांबावून गेले. खासा सेनापती अफजलखान पडला, ही बातमी वाऱ्यासारखी चौफेर पसरली आणि ती समजताच गडाखालचे सैन्य रस्ता दिसेल तिकडे सैरभैर पळू लागले. या घटनेने महाराजांचा डंका संपूर्ण भारत वर्षात गाजू लागला. मोगल बादशहासह परकीय व्यापाऱ्यांनीही महाराजांच्या नावाची दहशत घेतली.

### महाराजांच्या मोहिमा आणि योजनांची फलश्रुती

महाराजांच्या प्रत्येक मोहिमेमागे/योजनेमागे काही ध्येयं, उद्दिष्टं असायची. मोहीम यशस्वी होत नाही, असे दिसताच त्यांचा प्लान बी तयार असायचा आणि त्यामधूनही निश्चित काय साधायचं तोही महाराजांचा मानस पक्का असायचा. पुरंदरचा तह या घटनेवरून तर महाराज किती दूरदृष्टीचे होते, याचे प्रत्यंतर येते. मिर्झा राजे जयसिंह हा औरंगजेबाचा खास सरदार अत्यंत शूर, मुत्सद्दी आणि अनुभवी. अशा सरदारास औरंगजेबाने स्वराज्यावर रवाना केले. हा प्रसंगसुद्धा खूपच बाका होता. शत्रूकडे मोठ्या प्रमाणात सैन्य, दारूगोळा आणि संपत्ती होती. त्या तुलनेत स्वराज्याची ताकद दुबळी होती. याही ऊपर मिर्झा राजेंसारखा अत्यंत संयमी, धोरणी, मुत्सद्दी आणि अनुभवी सेनापती मोहिमेचे नेतृत्व करत होता. त्यावेळी महाराजांनी अत्यंत बुद्धीचातुर्याने मिर्झाराजा जयसिंहाला मात दिली.

महाराजांचे चरित्र अभ्यासत असताना एक सामान्य व्यक्तिमत्त्व असामान्य कसं घडतं, याची अनुभूती येते. केवळ ५० वर्षांच्या आयुष्यामध्ये महाराजांनी जे करून दाखवलं, ते पाहता साडेतीनशे वर्षांनंतरसुद्धा 'शिवाजी' या नावात इतका दबदबा, आदरभाव का आहे, याचे प्रत्यंतर येते आणि छत्रपती शिवराय नावाचं गारुड हे यापुढेही भारताच्याच नव्हे, तर जगाच्या पटलावर हजारो वर्षे राहील, यात शंका नाही.

**(अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, कर्नाटक



**अजय भोसले**

*छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक संके टाक येथे आहे. संके टाक हे मल्लेश्वरम परिसरात असल्यामुळे त्या भागातील एक महत्त्वाचे आकर्षणाचे केंद्र ठरले आहे.*

बेंगळुरूमधील मल्लेश्वरम मंदिरानजीक छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा अश्वारूढ पुतळा दिमाखात उभा आहे. सदर स्मारक कोणी उभारले यांची माहिती आढळून येत नाही. शिवप्रेमींनी हे स्मारक उभारल्याची माहिती मिळते. मल्लेश्वरमच्या परिसराचे नाव कडू मल्लेश्वर मंदिरावरून ठेवण्यात आले आहे. हे या प्रदेशातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. कडू मल्लेश्वर मंदिर हे प्राचीन मंदिर आहे. कन्नड भाषेत 'काडू' म्हणजे जंगल आणि स्थानिक कथेनुसार, मल्लेश्वर 'नर ईश्वर'पासून आला आहे. एकत्रितपणे म्हणजे 'वनाच्या टेकडीवर असलेला देव' कारण हे मंदिर एका टेकडीवर बांधलेले आहे. हा देव म्हणजे मल्लिकार्जुन, जे शिवाचे एक रूप आहे.

मंदिराच्या शेजारी सन १६६९ मधील एक शिलालेख आढळतो. जुन्या कानडीत असलेला हा शिलालेख वेंकोजी यांनी १६६९ मध्ये लिहिलेला होता. हे वेंकोजी म्हणजे शहाजीराजांचा मुलगा आणि शिवाजी महाराज यांचा सावत्र भाऊ.

जेव्हा शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज विजापूर जहागिरीत असताना शहाजी राजांना बेंगळुरूचा प्रदेश मिळाला होता. ते त्यांचा मुलगा वेंकोजी यांच्यासह काही वर्षे येथे स्थायिक झाले. शिवाजी महाराज १६४० मध्ये बंगळुरूला आले होते. याचा उल्लेख कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत ग्रंथात आहे. त्यानंतर शिवाजी महाराजांना उत्तरेकडील शहाजी राजांच्या जहागिरांमध्ये परत पाठवण्यात आले, तर त्यांचा दुसरा मुलगा वेंकोजी यांना बंगळुरूची जहागीर देण्यात आली. बेंगळुरूमध्ये असताना त्यांनी कडू मल्लेश्वर मंदिरासाठी महत्त्वाचे कार्य केले.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**




# शिवरायांची राजमुद्रा व पत्रव्यवहार

**अजय भोसले**

राजमुद्रा अष्टकोनी आकाराची आहे. राजमुद्रा उमटवयाचे काही संकेत होते. ते असे : प्रशासकीय कामकाजाच्या पत्रावर राजमुद्रा शीर्षस्थानी उमटवली जायची. नातलग, वडीलधारी मंडळी, साधू यांच्यासाठी शिवमुद्रा पत्राच्या मागील भागावर उमटवली जायची. (यांच्याप्रति अधिकार न दर्शविता आदर व्यक्त करण्यासाठी) या व्यतिरिक्त एक छोटी मर्यादा मुद्रा असायची, त्यावरचा मजकूर 'मर्यादेय विराजते' म्हणजे लेखनाची मर्यादा. मर्यादा मुद्रेच्या पुढे कुणीही अन्य मजकूर लिहू नये, हा उद्देश होता.

*मुद्रेवरील वाक्य :–*

*प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।*
*शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।*

संस्कृत भाषेत ही मुद्रा अंकित केली आहे.

याचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.

प्रतिपदेचा चंद्र जसा चंद्रकलेप्रमाणे वृद्धिंगत होऊन जगाला वंदनीय होतो, त्याप्रमाणे शहाजी पुत्र शिवाजी महाराज यांचा लौकिक वाढत जाईल व ही राजमुद्रा लोकांच्या कल्याणासाठी असेल. म्हणजे त्यातील अर्थ हा शिवरायांच्या हिंदवी साम्राज्याच्या चढत्या क्रमाचे जणू भाकीतच होते.

राजमुद्रा उमटवलेली मोजकीच पत्रे आज उपलब्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत, त्यापैकी काही ठिकाणे पुढीलप्रमाणे :–

**पुणे** – पुरा लेखागार, **धुळे** – राजवाडे मंडळ, **पुणे** – ठकार संग्रह, **सातारा** – श्रीभवानी संग्रहालय, **कोल्हापूर** – पुरा लेखागार, भारत इतिहास मंडळ इत्यादी ठिकाणी उपलब्ध आहेत.

शिवकालीन पत्र वाचताना काही संदर्भ समजून घेणे आवश्यक आहे.

**मजहर** – अनेकांच्या साक्षीने लिहिलेली नोंद.

**शहुर** – शहुर सनाचे आकडे शब्दात असत. उदा. इदिहे खमसैन अलफ (इसवी सन १६५१–५२) अशा पद्धतीने नोंद केली जायची.

**पोटपत्र** – महाराजांनी पाठवलेल्या पत्राचा आधार घेऊन संबंधित अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यास सदर आदेश उद्धृत करून जे पत्र पाठवत असे, असे पत्र.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

*महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कडेकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहास, पराक्रम आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गडकिल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.*



शिवनेरी

# छत्रपती शिवरायांची पराक्रम स्थळे युनेस्कोच्या व्यासपीठावर!

**प्रवीण टाके**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेनेदेखील गडकिल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच, याशिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळून भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पूर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यातसुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल, तर तुम्ही भीमपराक्रम जगापुढे ठेवू शकता, हजारो वर्षे येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता, असा वस्तुपाठ छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.



राजगड

## युनेस्को : कार्य आणि भूमिका

युनेस्को (United Nations Educational Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी World Heritage Convention १९७२ तयार करण्यात आले.

भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, सात नैसर्गिक, एक मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गडकिल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस केंद्र सरकारअंतर्गत भारतीय पुरातत्त्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.



रायगड

## पराक्रमाच्या १२ यशोगाथा

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील एक जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षण कवच असलेला खांदेरी किल्ला, तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे.



प्रतापगड

## तत्कालीन युद्धनीतीचे शिलालेख

महाराष्ट्रातील हे ११ व तामिळनाडूतील एक असे १२ किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत. हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी, जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीती विशद करणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेखही आहेत. थोडक्यात प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे. जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांनादेखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावरही किल्ले बांधण्यात आले. ज्यामुळे शत्रूपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील माची एक वैशिष्ट्य – किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरूजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.



पन्हाळा

शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. गनिमी कावा अर्थात गुरिला युद्धनीतीमध्ये अशी रचना किती आवश्यक असते, याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारे अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षण व्यवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात. या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

## शिवरायांचा प्रताप जगव्यापी

या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीतीसोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्ध्याच्या पराक्रमाचे चिंतन, मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही, तर भारताच्या सन्मानाचे क्षण आहेत. जागतिक पर्यटकदेखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे, ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अमूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहोचेल आणि जगातील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**(उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.)**



साल्हेर

# शिवरायांचे दुर्गवैभव आता जागतिक ठेवा!

**युवराज पाटील**



विजयदुर्ग



सिंधुदुर्ग



लोहगड

छत्रपती शिवाजी महाराज यांनी बारा मावळमध्ये उभारलेले गडकिल्ले हे महाराष्ट्राच्या आत्म्याचे रूप आहेत. आता हे गड फक्त आपलेच नाहीत, तर संपूर्ण जगाचे झाले आहेत. युनेस्कोने ११ जुलै २०२५ रोजी महाराजांचे महाराष्ट्रातील ११ दुर्ग आणि एक दक्षिणेतील जिंजीचा किल्ला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आणि शिवरायांचे स्वराज्य – जागतिक नकाशावर अधोरेखित झाले. या ऐतिहासिक मान्यतेमागे अनेकांची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेला पाठिंबा आणि केंद्र सरकारकडून सक्रिय सहभाग ही अत्यंत मोलाची बाब ठरली. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि संस्कृती मंत्रालयाने यात मोठी मदत केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही वेळोवेळी मुख्यमंत्र्यांना साथ दिली. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्वत: जाऊन युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेतली. तेथे तांत्रिक सादरीकरण केले. मुख्यमंत्री कार्यालयातील अपर मुख्य सचिव विकास खारगे; तसेच भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी त्यात सहभागी होते. अनेकांचे हातभार लागले आणि त्यातून देशभरातील शिवभक्तांसाठी आजचा आनंदाचा क्षण साकारला गेला. त्या निमित्ताने या बारा किल्ल्यांचे महत्त्व अधोरेखित केलेला हा संकलित लेख...!!

हे फक्त किल्ले नाहीत, तर ते आहेत आपल्या अस्मितेचं जिवंत रूप! शिवरायांचे हे किल्ले म्हणजे इतिहासाचे सजीव संग्रहालय आहेत. इथल्या प्रत्येक दगडात स्वराज्याची ठिणगी साठलेली आहे. चला तर, पाहू या, या बारा दुर्गांची शौर्यगाथा – प्रत्येकाची वेगळी ओळख आणि शिवरायांच्या जीवनाशी नाळ जुळलेली!

**रायगड** हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजधानी किल्ला होता. येथेच १६७४ साली त्यांचा राज्याभिषेक झाला आणि मराठा साम्राज्याची औपचारिक सुरुवात झाली. रायगड हा राजकारण, प्रशासन आणि सैन्य संचालनाचे केंद्र होता. दुर्गम, मजबूत आणि नैसर्गिक संरक्षण असलेला हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्वप्नाचे प्रतिबिंब मानला जातो. रायगड म्हणजे मराठ्यांच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि स्वराज्याच्या गौरवाचे प्रतीक आहे. १६७४ मध्ये शिवरायांचा राज्याभिषेक याच गडावर झाला. महाराजांनी याला 'राजगड'चे रूप दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी याच किल्ल्यावर आपला देह ठेवला. त्यांची समाधी ही मराठी माणसांच्या अपार श्रद्धेचे ठिकाण आहे. रायगड म्हणजे स्वराज्याची मूर्तिपूजा!

**राजगड** किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेचा पाया मानला जातो. याचे जुने नाव मुरुंबदेव होते. इ. स. १६४६ साली छत्रपती शिवाजी महाराज यांनी राजगड किल्ला जिंकून घेतला आणि यालाच आपल्या स्वराज्याची पहिली राजधानी बनवले. जवळपास २६ वर्षे हा किल्ला राजधानी राहिला. इथेच महाराजांच्या पत्नी सईबाई यांचे निधन झाले आणि पुत्र संभाजी यांचे बालपणही याच किल्ल्यावर गेले. अफजलखान वधानंतर महाराज थेट राजगडावरच परतले होते. राजगड हा भक्कम, विशाल आणि रणनीतीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा किल्ला होता.

**प्रतापगड** किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचे आणि राजकीय चातुर्याचे जिवंत स्मारक आहे. सातारा जिल्ह्यात, महाबळेश्वरपासून जवळ असलेला हा किल्ला १६५६ साली महाराजांनी बांधला. याच किल्ल्यावर १६५९ साली अफझलखानाशी ऐतिहासिक युद्ध झाले. अफझलखानाचा पराभव हा स्वराज्यासाठी एक मोठा विजय होता. ही लढाई केवळ तलवारीची नव्हती, ती नियोजन, रणनीती आणि दृढ इच्छाशक्तीची होती. प्रतापगडावरून शिवरायांनी पहिल्यांदाच आपल्या युद्धनीतीची प्रभावी चुणूक दाखवली. यामुळेच प्रतापगड आजही शौर्य आणि चातुर्याची रणभूमी म्हणून ओळखला जातो. इथेच अफझलखानाच्या भेटीने इतिहास घडवला. महाराजांनी याच किल्ल्यावर शौर्य, राजनैतिक डावपेच आणि प्रसंगावधान याचा संगम दाखवून दिला.

**पन्हाळा** किल्ला हा कोल्हापूर जिल्ह्यातील एक भव्य आणि ऐतिहासिक किल्ला आहे. याचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील एका अत्यंत थरारक घटनेमुळे अधिक वाढते, ती म्हणजे पावनखिंडीची लढाई. इ.स. १६६० मध्ये सिद्धी जोहरच्या वेढ्यात अडकलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांनी गुप्त मार्गाने पन्हाळ्याहून विशाळगडाकडे प्रयाण केले. त्यावेळी बाजीप्रभू देशपांडे आणि काही मावळ्यांनी

सिद्धीच्या सैन्याला रोखण्यासाठी घाटमाथ्यावर पावनखिंडीत प्राणांची आहुती दिली. बाजीप्रभूंची ही शौर्यगाथा इतिहासातील एक अमर पर्व ठरली. पन्हाळा किल्ल्यावर अंधारबाव, अंबरखाना, धान्यकोठी, सर्जा–राजा बुरूज यांसारखी स्थापत्यवैशिष्ट्ये आहेत. हा किल्ला काही काळ मराठ्यांची राजधानीसुद्धा होता.

**शिवनेरी** हा किल्ला पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळ आहे आणि तो छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणून अत्यंत पवित्र मानला जातो. १९ फेब्रुवारी १६३० रोजी याच गडावर जिजाबाईंनी शिवरायांना जन्म दिला. हा किल्ला निसर्गरम्य, मजबूत तटबंदीने सजलेला असून आजही त्या ऐतिहासिक जन्मकक्षाचे दर्शन घेता येते. गडावरील जिजामाता व बाल शिवरायांचा संगमरवरी पुतळा; तसेच शिवकुंज हा परिसर पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. शिवनेरी हे शिवरायांच्या शौर्य, संस्कार आणि स्वराज्याच्या बीजारोपणाचे प्रतीक मानले जाते.

**लोहगड** किल्ला मावळ भागातील सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेला किल्ला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात एक महत्त्वाचा संरक्षण किल्ला होता. पुणे जिल्ह्यात लोणावळ्याजवळ स्थित असलेला हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ३,४५० फूट उंचीवर आहे. लोहगड किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या चारही दिशांना असलेल्या खोल दऱ्या आणि त्याच्या उत्तरेकडील ‘विंचूकाटा’ हे नैसर्गिक रक्षण असलेले टोक. प्राचीन काळी हा किल्ला भोर घाटामार्गे चालणाऱ्या व्यापार मार्गांचे संरक्षण करीत असे. त्यामुळेच याला व्यापार मार्गांचा रक्षक असे म्हटले जाते.

**साल्हेर** किल्ला हा महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यात वसलेला एक अतिशय महत्त्वाचा दुर्ग आहे. तो समुद्रसपाटीपासून सुमारे ५,२०० फूट उंचीवर असून सह्याद्रीतील सर्वांत उंच किल्ल्यांपैकी एक आहे. १६७२ साली झालेल्या साल्हेरच्या युद्धात, मराठ्यांनी मोगल सैन्याचा पराभव केला होता. हे युद्ध इतके थोर होते की, हजारो सैन्याच्या लढाया, घोडदळ, हत्ती, तोफा यांचा वापर झाला आणि अखेर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सेनापतींच्या कुशल नेतृत्वाखाली मराठ्यांनी विजय मिळवला.

**सिंधुदुर्ग** हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी अरबी समुद्राच्या लाटांवर बांधलेला अजेय जलदुर्ग आहे. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील मालवणजवळ तो वसलेला आहे. इ.स. १६६४ मध्ये महाराजांनी हा किल्ला बांधण्यास सुरुवात केली. समुद्राच्या मध्यभागी खोल पाण्यात हा किल्ला उभारण्यात आला असून तो स्वराज्याच्या सागरी संरक्षणाचे प्रतीक आहे.

**विजयदुर्ग** किल्ला हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडजवळ, अरबी समुद्रकिनारी वसलेला एक अत्यंत भक्कम आणि ऐतिहासिक सागरी किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुमारे १० वर्षे येथे नौदल उभारणीसाठी काम केले. हा किल्ला त्यांच्या नौदल सामर्थ्याचा केंद्रबिंदू होता. शत्रूच्या जहाजांना न दिसणारा अदृश्य सागरी चढाईमार्ग ही येथील खासियत होती.

**सुवर्णदुर्ग** किल्ला महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात, दापोली तालुक्यातील हर्णे बंदराच्या समोर सागरात वसलेला एक भव्य सागरी दुर्ग आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी इ.स. १६६० च्या सुमारास हा किल्ला सिद्धींच्या ताब्यातून काबीज केला आणि त्याची सागरी संरक्षण दृष्टीने पुनर्बांधणी करून मजबूत केला.

**खांदेरी** किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सागरी दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण! सुमारे १६७९ साली अरबी समुद्रातील या बेटावर महाराजांनी खांदेरी किल्ल्याची उभारणी सुरू केली. याचे उद्दिष्ट मुंबई बंदरावर नजर ठेवणे आणि स्वराज्याचे सागरी संरक्षण मजबूत करणे हे होते. इंग्रज व सिद्धींविरुद्ध मराठा नौदलाच्या संघर्षात खांदेरीने निर्णायक भूमिका बजावली.

**जिंजी** किल्ला म्हणजेच दक्षिणेचा जिब्राल्टर असा ओळखला जाणारा हा किल्ला तामिळनाडूमधील विलुप्पुरम जिल्ह्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र राजाराम महाराज मुघलांपासून बचाव करत दक्षिणेकडे गेले, तेव्हा व्यंकोजी भोसले यांची मदत आणि पाठिंबा मिळाला. त्यांनी जिंजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात येण्यासाठी मदत केली. हा किल्ला तीन टेकड्यांवर विस्तारलेला असून त्याच्या परिसराला १३ कि.मी.चा परीघ आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या या किल्ल्यांना युनेस्कोची मान्यता मिळाल्याने त्यांचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटन मूल्यमापन वाढेल, जागतिक संवर्धन निधी आणि तांत्रिक मदत मिळेल, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, युवा पिढीपर्यंत स्वराज्याची खरी जाणीव पोहोचेल. हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात युनेस्कोच्या अधिकारी वर्गासोबतच भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय, पुरातत्त्व विभाग, आणि महाराष्ट्र शासन यांचेही मोठे योगदान आहे. हे केवळ ‘वारसा’ म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय अभिमान म्हणून जपले जाईल. हा इतिहास आता आपल्या बरोबर जगाचाही असणार आहे. शिवकाल फक्त आठवणीत नको, तो अनुभवात यायला हवा... आणि आता तो अनुभवण्यासाठी जगातून लोक महाराष्ट्रात येतील!

**(जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.)**



सुवर्णदुर्ग



खांदेरी



जिंजी

**छत्रपती शिवाजी महाराज म्हणजेच एक असाधारण व बुद्धिमान राजा अशी जागतिक कीर्ती ही फक्त लढाई आणि साम्राज्य विस्तार एवढीच नसून, यासोबत महाराजांच्या अभ्यासू आणि संशोधनात्मक विकसनशील धोरणाचे प्रमाण आहे. दुर्गनिर्मिती, किल्ल्यांची पुनर्बांधणी, व्यापार व शेतीविषयक धोरणे यासोबतच शस्त्रनिर्मितीचे कारखाने हादेखील त्याचाच भाग आहे. पूर्वापार आणि परंपरागत चालत आलेली शस्त्रे, जशीच्या तशी न वापरता त्यामध्ये तत्कालीन व भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक बदल छत्रपती शिवाजी महाराजांनी करवून घेतले. ज्यामुळे लढाया करणे आणि शस्त्रास्त्रे सहज चालविणे अधिक सोपे आणि यशस्वी ठरले. अभ्यासपूर्वक आणि संशोधनात्मक गरजेनुसार बनविलेल्या या शस्त्रांच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती म्हणजेच 'गनिमीकावा' यशस्वी ठरली आणि जगमान्य सुद्धा झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात काही पारंपरिक; तसेच काही नवनिर्मित शस्त्रांचा यशस्वी वापर झाला. त्यापैकी काही निवडक शस्त्रे आपण पाहूयात.**

# छत्रपती शिवरायांच्या कालखंडातील शस्त्रे

**विनोद विजय साळोखे**

## वाघनखं

वाघाची नखे अत्यंत कठीण, चिवट; तसेच नैसर्गिक रंगात असल्यामुळे सहजरीत्या लपवता येतात.

व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियम, लंडन येथे ही वाघनखे





पाहण्यास उपलब्ध आहेत. पोलाद, चामडे यापासून वाघनखे तयार करण्यात आली होती. याची लांबी अंदाजे साडेतीन इंच आहे. हे शस्त्र वजनाने हलके आहे. शस्त्राचा आकार वाघाच्या पंजाशी मिळताजुळता असल्याने या शस्त्रास वाघनख म्हणतात.

## बिचवा

बिचवा (खंजीरसदृश कमरेला बाळगण्याचे शस्त्र) हे अत्यंत लहान; पण घातक असे शस्त्र त्यावेळेला बनवण्यात आले होते. त्याचा उल्लेख पूर्वी किंवा नंतर कुठे आढळून येत नाही. हाताच्या पंजामध्ये अडकवल्यानंतर ते शस्त्र सहजासहजी हातातून निसटून बाहेर येत नाही. हे शस्त्र आकाराने छोटे असल्याने लपवता येते.

## पट्टा

तलवारीपेक्षा लांबीला जास्त (चार फुटांपेक्षाही जास्त) अधिक धारदार, किंचित लवचिक व दुधारी असल्यामुळे या शस्त्राची प्राणघातक क्षमता अधिक होती. यासोबतच या शस्त्राचा वापर करताना विशिष्ट संरचनेमुळे योद्ध्याच्या हाताला आपोआपच एक संरक्षण कवच मिळत होते. मनगटात पकडण्यात येणाऱ्या तलवारीच्या मुठी पेक्षा अतिशय विशिष्ट प्रकारे पट्टा या शस्त्राची मूठ (खोगळा) बनवली जात असे. वार करताना फक्त मुठीपासून ताकद न लागता, हाताच्या कोपरापासून, किंबहुना खांद्यापासून ताकदीचा वापर त्याच्यामध्ये होत असे. यामुळे या शस्त्राची मारक क्षमता तलवारीपेक्षा जास्त होती. पट्टा हे शस्त्र लांब पात्याचे असून शत्रूला जवळ येण्यास मज्जाव करून तलवारीपेक्षा अधिकच्या अंतरावर शत्रूला जायबंदी करण्यासाठी उपयोगी होते. कैक वेळेस या शस्त्रावरती विषारी लेपन केल्याचेसुद्धा नमूद आहे. या शस्त्राशीच साधर्म्य असणारे दक्षिणेतील उर्मी हे शस्त्र कित्येक वेळा गैरसमजुतीतून अनेक चित्रपट मालिकांमध्ये दाखविण्यात आले आहे; पण उर्मी हे शस्त्र फारच लवचिक (spring weapon) असून ते कमरेभोवती गुंडाळता येत होते; पण पट्टा हे शस्त्र इतके लवचिक नव्हते. पट्टा चालविण्यासाठी विशिष्ट पद्धत व वार यांची सांगड घालावी लागते. संपूर्ण शरीराचा जोर याच्यामध्ये वापरला जातो. मराठी भाषेत पटाईत हा शब्द पट्टा चालवण्यात निष्णात तरबेज असणाऱ्या योद्ध्याला अनुसरून आहे.



## तलवार

तलवारीच्या अनेक शेकडो प्रकारांपैकी मराठ्यांच्या वापरातील किंबहुना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात विकसित झालेल्या मुल्हेरमुठी तलवारीचा गौरव अधिक होतो. कारण या तलवारीची विशिष्ट रचना. मुठीला परज नामक असणारे संरक्षण कवच. हाताची पकड घट्ट बसण्यासाठी विशिष्ट रचना. देठ नामक अतिरिक्त सुविधा यासह वजनाने हलके; पण मजबूत-संतुलित व चिवट पाते. अनेक अभ्यासक तलवारीच्या परज या भागाचे विशेषण मुठीचे-बोटांचे संरक्षण फक्त असेच सांगतात; पण मुठीचे संरक्षण हे दुय्यम असून, त्याचा मुख्य उपयोग लढाईत तलवारीच्या पात्यावरून ओघळून येणारे रक्त मुठीत येऊन पकड सैल होत असे. त्याऐवजी ओघळून येणाऱ्या रक्ताला बाहेरून वाट करून देणे हे होते. अचानक जवळ आलेल्या शत्रूला तलवारीच्या मागील देठाने जायबंदी करणे यासह तलवारीला



संतुलन देणे हेदेखील त्या देठाचे विशेष कार्य होते. पात्यावरती विशिष्ट पद्धतीने कमी अधिक प्रमाणात असणाऱ्या खोलगट रेषा (नाळ/groved lines) पात्याचे वजन हलके करणे व भोकसल्यानंतर शत्रूच्या शरीरात हवेचा प्रवेश होऊन रक्तात गुठळ्या निर्माण करणे. तसेच शस्त्र सहज बाहेर उपसून काढणे यासाठी असे. मुल्हेरमूठ तलवारीमध्ये सडक अर्थात धोप आणि वक्र असे दोन प्रकार पाहावयास मिळतात. सडक म्हणजेच सरळ लांब पात्याच्या तलवारीचा उपयोग विशेषत: घोड्यावरून केल्या जाणाऱ्या लढाईत केला जात असे. त्याचबरोबर वक्र या मुल्हेरमुठी तलवारीचा वापर पायदळातील लढाई अधिक करत. याचे कारण वायुगतीशास्त्र आकार (aerodynamic shape) यामध्ये दडलेले आहे.

## ढाल

प्रत्येक योद्ध्यासाठी आत्मसंरक्षण अतिशय महत्त्वाचे. ढाल ही इतर शस्त्रांपेक्षा अति महत्त्वाचे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, कारण प्रत्येक युद्धनीतीमध्ये आक्रमणापेक्षा संरक्षणाला प्रथम प्राधान्य दिले जाते. ढाल या शस्त्राचा समावेश संरक्षक शस्त्रांमध्ये होतो. अनेक चित्रपट व मालिकांमध्ये असंधर्भ धातूंच्या ढालींचा वापर दाखविला जातो; पण इतिहासात धातूंच्या ढालीचा वापर केला जात नव्हता. त्याऐवजी झाडाच्या सालीपासून लाकडापासून व जनावरांच्या चामड्याचा सर्रास वापर ढालींसाठी केला जात असे. विशिष्ट प्रक्रियेनंतर चिवट व मजबूत केलेले चामडे (कमावलेले चामडे) हे अभेद्य व अतूट असते. अशा कमावलेल्या चमड्यावर टोकदार किंवा धारदार शस्त्राचा परिणाम होत नाही, म्हणून चामड्याचा वापर जास्त प्रमाणात केला जात असे. लढाईमध्ये एक योद्धा फक्त एका ढालीसह जात नसून, दोन किंवा त्यापेक्षा अधिक ढाली सोबत बाळगत असे. त्यामुळे धातूच्या वजनदार ढालींपेक्षा, चामड्याच्या हलक्या वजनाच्या चिवट व मजबूत ढाली सोबत वागविणे सोपे होते. अनेकदा बांबू किंवा वेताच्या विणलेल्या तट्ट्यांचा वापर ढालीसारखा केला जाई. याशिवाय अनेक चिवट अशा वेली किंवा गवतसदृश वनस्पतींच्या विणकामाचा वापरदेखील ढालींसारखा केला जात असे. ढालींसाठी प्राण्यांची शिंगे व हाडे यांचासुद्धा वापर बऱ्याच वेळा केला जात होता. काळवीटासारख्या प्राण्याची शिंगे ही अतिशय मजबूत, वजनाला अत्यंत हलकी असतात. ज्याच्या वरती कोणत्याही धारदार शस्त्राचा वार (प्रहार) परिणामशून्य असतो. माडूसारख्या शस्त्रामध्ये काळवीटाच्या शिंगांचा वापर ढालीप्रमाणेच खंजिरासारखादेखील केला जातो. अनेकदा प्राण्यांची कवटीसुद्धा ढालीसारखी वापरली जात असे. काही ठिकाणी मगर, गेंडा किंवा कासवसारख्या प्राण्यांचे कवचदेखील ढाल म्हणून वापरण्यात येत असे.



# विटा

मराठ्यांच्या इतिहासामध्ये मराठ्यांनी शोध लावलेले व विकसित केलेले असा ज्याचा उल्लेख केला जातो ते शस्त्र म्हणजे विटा. काठीच्या एका-एका बाजूला लांब निमुळते धारदार व टोकदार फळ (बाळ) बसविलेला असतो. दुसऱ्या बाजूला धातूची कडी करून त्यामध्ये दोरी बांधलेली असते. याशिवाय या शस्त्राला प्रोपेलरसुद्धा बसवलेला असतो. भाला फेकून मारल्यामुळे एक शस्त्र गमवावे लागते. त्याची उणीव भरून काढण्यासाठी म्हणजेच ते शस्त्र परत हातात घेण्यासाठी भाल्यासारख्याच शस्त्राला पाठीमागच्या बाजूला दोरी (काढणी) बांधून ते शस्त्र पुन्हा खेचून हातात घेतले जाते. लक्ष अचूकपणे टिपून ते शस्त्र परत हातात येते, म्हणून कालांतराने या शस्त्राला इंग्रजांनी मराठा बुमरँग म्हणूनदेखील गौरविले होते. नरवीर शिवा काशीद यांची ओळख विटेकरी म्हणूनच



इतिहासात नमूद आहे. विटा चालवण्यात अत्यंत निष्णात असा योद्धा म्हणून त्यांचा लौकिक होता. विटा हे शस्त्र जितके शत्रूसाठी घातक होते, तितकेच चालवणाऱ्यांसाठीसुद्धा ते अत्यंत धोकादायक असे होते. पाठीमागे लावलेली दोरी खेचण्याची वेळ एखाद्या सेकंदाने चुकल्यास ते शस्त्र उलटून फेकणाऱ्याच्याच शरीरात आरपार जाऊ शकते. काही निवडक योद्धेच या शस्त्राचा वापर करत असत. या शस्त्राचा वापर मराठ्यांखेरीज इतर कुणीही केल्याचे इतिहासात नमूद नाही. पट्ट्याऐवजी मराठ्यांनी शोध लावलेल्या आणि विकसित केलेल्या विटा या शस्त्राचा अधिकार राज्यशास्त्र या पदावर जास्त आहे.

**(लेखक हे शिवकालीन व अन्य ऐतिहासिक विषयाचे अभ्यासक आहेत.)**



## अंकुश

लोखंड व पोलादापासून तयार केलेले आहे. अंकुशाची लांबी अंदाजे १५ इंच असते. अंकुशाला स्वतंत्र दंड असतो. अंकुशाचे पाते तीक्ष्ण व अणकुचीदार असून बदामाच्या आकाराचे आहे. पात्याच्या उजव्या बाजूला निमुळता वक्र भाग बनवलेला आहे. सदर शस्त्राचा वापर हत्तींवर ताबा ठेवण्यासाठी केला जात असे.



## कुऱ्हाड


कुऱ्हाडीची लांबी साधारणत: ४० इंच आहे. कुऱ्हाडीचा दंड वेताचा असतो. दंडाच्या डाव्या बाजूला अर्धचंद्राकृती लोखंडी पाते जोडलेले आहे. पाते दंडाला जोडण्यासाठी बारीक पितळी खिळे आणि तारा यांचा वापर केलेला आहे. कुऱ्हाडीची रचना साधी असून एकधारी पात्याला आतल्या बाजूने धार आहे.



छत्रपती शिवाजी महाराज यांचे हे चित्र
कोल्हापूरचे दिवंगत जी. कांबळे यांनी साकारले आहे.




यादवाड, जि. धारवाड, कर्नाटक येथे असणारे
छत्रपती शिवरायांचे दगडी शिल्प.



शिवसमाधीचे दुर्मीळ चित्र.

**संकलन : प्रशांत शिर्के**
(कक्षा अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.)





श्री. राम कस्तुरे हे प्रसिद्ध सुलेखनकार आहेत. माजी प्रधानमंत्री सन्माननीय श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या कवितेवर आधारित श्री. राम कस्तुरे यांनी रेखाटलेल्या सुलेखन कलाकृतीचे कौतुक केले आहे. अमूर्त चित्रशैली हे त्यांचे वैशिष्ट्य. आज भारतात अमूर्त सुलेखनात काम करणारे जे मोजके कलाकार आढळतात, त्यात श्री. राम कस्तुरे आघाडीवर आहेत.






अजय भोसले, अवर सचिव, साप्रवि यांनी रेखाटलेली छत्रपती शिवाजी महाराज यांची रेखाचित्रे.





*कुंद कहा, पयवृंद कहा,*
*अरूचंद कहा सरजा जस आगे?*
*भूषण भानु कृसानु कहाब*
*खुमन प्रताप महीतल पागे?*
*राम कहा, द्विजराम कहा,*
*बलराम कहा रन मै अनुरागे?*
*बाज कहा मृगराज कहा*
*शिवकवि कविराज भूषण*
*अतिसाहस मे सिवराजके आगे?*

**अर्थ :** कुंद कळ्यांची शुभ्रता, दुधाची आणि आकाशातील पौर्णिमेच्या चंद्राची धवलता ही शिवरायांच्या यशासमोर फिकी आहे. या पृथ्वीवर पसरलेल्या आयुष्यमान शिवरायांच्या प्रताप तेजापुढे अग्नी आणि सूर्य यांचे तेजही कमीच आहे. दाशरथी राम बलराम यांचा पराक्रम शिवरायांच्या पराक्रमापुढे कमीच आहे. साहसात ससाणा आणि मृगराज सिंहदेखील शिवरायांसमोर फिकेच आहेत.

**– शिवकवी कविराज भूषण**

# शिवराय गाथा



*'यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत*
*पुण्यवंत नीतिवंत। जाणता राजा।*
*आचारसीळ विचारसीळ। दानसीळ धर्मसीळ।*
*सर्वज्ञपणे सुसीळ। सकळां ठाई ।*
*धीर उदार आणि सुंदर। शूर क्रियेसी तत्पर।*
*सावधपणे नृपवर। तुच्छ केले।*
*या भूमंडळाचे ठायी। धर्मरक्षी ऐसा नाही।*
*मऱ्हाष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हाकारणे।*
*कितेक दुष्ट संव्हारिला। कितेकासी धाक सुटला।*
*कितेकांसी आश्रयो जाला। शिवकल्याण राजा।*

**– समर्थ रामदास**

*श्रुतिस्मृतिपुराणेषु भारते दण्डनीतिषु।*
*समस्तेष्वपि शास्त्रेषु काव्ये रामायणे तथा ।*

*व्यायामे वास्तुविद्यायां होरासु गणितेष्वपि ।*
*धनुर्वेदचिकित्सायां मते सामुद्रिके पुनः ।।*

*तासु तासु च भाषासु छन्दस्सु च सुभाषिते ।*
*चर्यास्विभरथाश्वानां तथा तल्लक्षणेष्वपि ।।*

*आरोहणे प्रतरणे चंक्रमे च विघंलने ।*
*कृपाणचापचकेषु प्रासपट्टिशशक्तिषु ।।*

*युद्धे नियुद्धे दुर्गाणां दुर्गमीकरणेषु च ।*
*दुर्लक्ष्यलक्ष्यवेधेषु दुर्गमाभिगमेष्वपि ।।*

*इङ्गितेषु च मायासु विषनिर्हरणादिषु ।*
*तत्तद्रत्नपरीक्षायामवधाने लिपिष्वपि ।।*

*प्रवीणः स स्वयं तांस्तान् गूरुन् गुरुयशोभरैः ।*

**अर्थ :** श्रुति, स्मृति, पुराणे, भारत, राजनीति, सर्व शाखें, रामायण, काव्य, व्यायाम, वास्तुविद्या, फलज्योतिष, सांग धनुर्वेद; तसेच तामुद्रिक, निरनिराळ्या भाषा, पद्य, सुभाषित, हत्ती, घोडे व रथ यांवरून बसणे; तसेच त्यांची लक्षणे, चढणे व उतरणे दौड मारणे, उडी मारणे, तरवार धनुष्य व चक्र, भाला, पट्टा व शक्ती, युद्ध व बाहुयुद्ध, दुर्ग अभेद्य (दुर्गम) करणे, दुर्लक्ष्य निशाण वेधणे, दुर्गम संस्थानांतून निसटून जाणे, इंगित जाणणे, जादुगिरी, विष उतरणे, नाना प्रकारची रत्नपरीक्षा, अवधाने, या सर्व विद्या शाखें व कला यांमध्ये स्वतः प्रवीण होऊन सर्व गुरूंस मोठे यश दिले.

**कवी – परमानंद**
**(संदर्भ : शिवभारत ग्रंथ)**

# मातीचा किल्ला

किल्ल्यावर उभ राहायचं....
किल्ला असाच राहत नसतो उभा,
देखणं स्वराज्य त्यात ओतप्रोत भरून असतं कायमचं....
चिखल, माती, दगड, धोंडे,
काय काय असतं हो किल्यात....
उघड्या डोळ्यांनी राजानं पाहिलेलं स्वप्न असतं किल्ल्यात,
वादळासारखं घोंघावत....
येत- जात असते हळुवार एखादी वाऱ्याची झुळूकही
किल्ल्यावरून बारोमास....
सोसाट्याचा वारा शेकडोंदा, अदमासत असतो अशाच किल्ल्यावरून....
हत्तीच्या अंगावरून किल्ल्यावर
पोहोचलेली रसद आठवली की आठवतं
मुक्या जीवांचं थोरलेपण....
दौडत आलेल्या घोड्याच्या पाठीवरून राजा
कित्येकदा आलेला असतो किल्ला जगत....
घिरट्या घालत गरूडानं, शतकांचं गारुड डोळ्यात केलेलं असतं उभं....
वाघ माणसांच्या रूपात किल्ल्याने पाहिलेले असतात....
माती भरलेल्या उराने असते, किल्ल्यावर रेंगाळत....
नाकपुड्यात पुरेपूर शौर्यच भरून जातं....
धमण्याधमण्यात सळसळणारं रक्त वाहत असतं इथल्या माणसांच्या....
दगडांचा किल्ला, जणू पालखीचे भोईच ठरलेले हे दगड किल्ल्याचे
आणि अनेक पावलांच्या वाटेकरी ठरलेल्या या रानातल्या पायवाटा
डोळ्यात इतिहास जगून जातात....
कित्येक सैनिकांचं, मावळ्यांचं रक्त वाहिलेलं असतं किल्ल्यात
दुधाचे पाट वाहावेत तसे, मावळ्यांच्या रक्ताचे लाखो समुद्र
किल्ल्यावर ओघळलेले असतात....
किल्ल्यावरच्या पाण्याच्या टाकी, तळी,
किल्ला जिवंत असल्याच्या चवदार खाणाखुणा जागवत असतात अंगावर....
किल्ल्यावरच्या भुयारातून उजेडालाही जायचं असत अटकेपार....
कित्येक सरत्या वाटांचं मोक्षाचं दार असतं भुयार कोण जाणे....
गडद अंधाराला पोटात घेऊन भुयारं उजेड झालेली असतात
किल्ल्याकिल्ल्यावर....
बालेकिल्ल्याची गोष्टच न्यारी,
कित्येक शत्रूंना बालेकिल्ला आलेला असतो थोपवत,
आपल्या मजबूत अंगाने उंच झालेला....
किल्ल्यावरच्या जीवांचं, मुक्या जीवांचं पोट भरत आलेली कोठारं,,,
मायेकरीच इथल्या राकट मनगटांचे...
धनधान्याच्या राशींनी जणू पारणंच फेडलीत डोळ्यांची....
किल्ल्याची माची आभाळच गाठायची,
तिच्यापुढ माणसे ठेंगणी होऊन जायची,
माचीवरून डोळ्यांनी राजा दूरवर पाहायचा....
राजा आल्यागेल्याचा साक्षीदार, महादरवाजा
कित्येकदा महान झालायं, राजाच्या विजयाच्या सोहळ्यांनी....
अनेक पावलांच्या पुढे उभा, ताठ मानेनं उभा राहिलाय, दिंडीदरवाजा....
तटबंद्यांनी किल्ल्याला हात दिलेत....
बुरूजांनी उभं आयुष्य, तोफांना विचारा थरकाप काय असतो,
असं स्वतःची राखरांगोळी करून स्वराज्याच्या कामी आलेल्या तोफा,
किल्ल्यावरच निशाण अजून उंच करत आल्यात आजवर....
चोरदरवाजे, किल्ल्याच्या काळजातली गुपितेच जणू कातळात चोरून,
राजाला वाट दाखवणारे....
सह्याद्रीचं निधड्या छातीचं भरलेपण,
किल्ला वागत असतो आपल्या अंगावर....
राजा, मावळे, सैन्य, राणीवसा, युद्ध मोहिमा, लढाया, योजना, दरबार,
काय-काय खेळवलेलं असतं किल्ल्यावर....
अनेक शतकांच्या बालेकिल्ल्यांचं
आभाळाला जागं राहायचं सांगणं, एकेक गोपूर होत गेलेलं...
किल्ल्याने काय काय पाहिलेलं असत हो,
राणीमहाराण्यांचा विरह, प्रजेचं गाऱ्हाणं, राज्याचं राजपण...
जिवलगांच्या फितुऱ्या काळजात रुतलेल्या, किल्ला अजून सोडवतोय....
एकेक किल्ल्याला विचारा, दगडांचा किल्ला,माणसांचा इतिहास सांगतो...
नगारखान्याच्या गर्जनांनी, किल्ल्याचे दणट झालेले कान....
तुतारीच्या ललकारीनं हरपून गेलेले देहभान....
लेझिम, हलगी, ढोल ताशा होताच सुख दुःख सांगायला....
दाराशी येऊन प्रवेशाचं मागमूस न लागलेला किल्ला रयतेला घर
आणि दुश्मनाला डर वाटत आलेला असतो आजवर...
राज्याच्या देखण्या स्वराज्याचं स्वप्न रेंगाळत असतं
इथल्या किल्ल्या-किल्ल्यांवरून....
राजाचं रांगडं स्वराज्य, खेळत असतं किल्ल्या-किल्ल्यांवर....
राणीवसा, दरबार, आदेश हुकूम, न्यायनिवडा
युद्ध, खलबत, मोहिमा घडत-झडत असतात किल्ल्यावर....
दगडांनी आपल्या छातीवर कोरलेला शिलालेख
इतिहासाच्या खऱ्याखुऱ्या दाखल्यांनी दस्तऐवज गिरवत राहतो....
खंदकांनी गड राखलेत अनेक सदरांनी न्याय दिलेत....
चुना बिलगून राहिलाय, दगडांनी जोडून राहावं म्हणून....
रायगड, राजगड दाखवतील डोंगरांनी राखलेलं स्वराज्य
सिंधुदुर्ग, जंजिरा दाखवेल,
पाणीही निष्ठावान असतं हो,
नळदुर्ग, परांडा सांगेल सपाट जमिनीवरही लढलोय आम्ही...
वासोटा सांगेल, झाडाझुडुपांचं लढणं काय असतं ते...
म्हणून म्हणतोय, गडकोट पाहू नये असेच,
जगता यायला हवं, गडावरल्या राजाचं थोरपण....
किल्ला मातीचा, माणसांचा, दगडांचा राहुट्यांचा असतोचं...
आणि हो, किल्ला बघायचा आणि जगायचाही असतो....

**– अनुज अविनाश केसरकर**
**स्वीय सहायक, मंत्रालय**



## ...स्व-राज्याच्याच कथा

दख्खनची माती वीरांची जननी,
त्यात जन्मला रयतेचा धनी
उंच नजर अन अढळ निर्धार,
दुश्मना पुढ न झुकणारा अवतार
सह्य कड्यांमध्ये गाज दूरवर,
हिंद देशी चढता साभिमानाचा सुर
भाले, तलवारी, रणघोष गगनी,
स्व देश-धर्मासाठी लढला गनिमी काव्यानि
जिवलग मावळे बनले विश्वासू सर्वे,
स्व प्राण तळ हाती ठेवून बनले अंगरखे
गडकोट उभे समुंदरही माग लौटला,
न्यायाने सन्मान मातीत या रुजवला
प्रत्येक हृदयी पेटती स्व राज्याची ज्योत,
धैर्याची कधीच न विझणारी जणू वात
अस्मानी संकटांनी जरी वेढले त्राही,
स्वराज्य रक्षणासाठी संघर्ष ललकारी
त्याग शौर्य अन जाज्वल्य स्वाभिमानची गाथा,
सह्य वारं, गड, समुद्र गाते स्वराज्याच्याच कथा
स्वराज्याच्याच कथा...

- प्रशांत अंजली सुर्यकांत शिर्के,
कक्ष अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.

# बेल धरण



प्रशांत शिर्के

बाल शिवराय हे जिजाऊ माँसाहेबांच्या समवेत शिवनेरीहून पुण्यास आले. शहाजीराजे यांनी नेमणूक केलेले कारभारी दादोजी कोंडदेव यांच्यासमवेत पुणे परगण्याची पाहणी केली. त्या वेळेस असे दिसून आले की, कात्रजहून वाहत येणारा आंबील ओढा हा पर्वती पायथ्यावरून पुणे गावात वाहत जातो. पावसाळ्यात पूर येऊन गावात नुकसान होत असे. त्या वेळेस जिजाऊ माँसाहेबांनी सांगितले, या ओढ्यावरती धरण बांधा, जेणेकरून पावसाळ्यात पुराचा त्रास गावकऱ्यांना होणार नाही व ढोर वस्तीमध्ये कातडी कमावण्यासाठी पाणी मिळेल. या गोष्टीचा विचार करून ओढ्याचा प्रवाह बदलला व सध्याच्या पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याशी असलेल्या दांडेकर पुलाच्या पश्चिमेला दिसणारे हे छोटेसे धरण (बंधारा) बांधण्यात आले. त्याचा आकार हा बेलाच्या पानासारखा असल्यामुळे हे 'बेल धरण' या नावाने ओळखले जाते.

(कक्षा अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.)

**वारणा आणि पंचगंगेची उपनदी असलेल्या कासारी नदीचा जलविभाजक असलेल्या सह्याद्रीच्या पूर्व दिशेने पसरलेल्या रांगेच्या उंच डोंगरावर वसलेला पर्नाल पर्वत म्हणजेच पन्हाळा. पन्हाळा हा पावनगड आणि पन्हाळा असा जोड किल्ला आहे. समोरच दख्खनचा राजा म्हणून ओळखला जाणारा जोतिबाचा डोंगर याच रांगेत आहे. ईशान्येला पसरलेले वारणेचे विस्तीर्ण खोरे, पूर्व आणि दक्षिणेकडे पंचगंगा, कासारीचे खोरे आणि कोल्हापूर परिसर, तर पश्चिमेकडे विशाळगडपर्यंतचा संपूर्ण परिसर नजरेच्या एका टप्प्यात येणारा हा किल्ला.**

# शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा'

**हेमंतकुमार चव्हाण**

शिलाहार राजा भोज यांनी बांधलेल्या किल्ल्यांपैकी एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे पन्हाळा. शिलाहारांच्या कोल्हापूर घराण्याच्या राजधानीचा मान या किल्ल्याकडेच होता. या किल्ल्याच्या वास्तुरचनेतून शिलाहारकालीन वास्तुनिर्मिती कशा प्रकारे होती हे दिसून येते. वाघ दरवाजा येथे असलेले मयुर आणि गरुडाचे चिन्ह हे या गडाचे प्राचीनत्व सिद्ध करते. कोकण आणि दख्खनचे पठार यांना जोडणारा महत्त्वाचा व्यापारी मार्ग हा प्राचीन काळापासून प्रचलित आहे. अनुस्कुरा घाट आणि आंबा घाट मार्गे होणाऱ्या व्यापारावर नियंत्रण ठेवणे, संपूर्ण कोल्हापूर आणि मिरींज देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने पर्नाल पर्वत हे ठिकाण मोक्याचे व महत्त्वाचे असल्याचे जाणून शिलाहार राजा भोज याने पन्हाळा हा किल्ला बांधला आणि त्याला आपल्या राजधानीचे स्थान बनवले.

असा हा प्राचीन पन्हाळा शिलाहारांनतर यादव आणि त्यानंतर बहमनी, आदिलशाही अशा सत्ताधीशांच्या अंमलाखाली राहिला. प्रतापगडच्या युद्धानंतर आदिलशाहीमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोल्हापूरपर्यंतचा आदिलशाही मुलूख जिंकला. त्याचवेळी म्हणजे १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी पन्हाळा किल्लाही जिंकून घेतला. त्यानंतर पन्हाळा किल्ल्याला आणखी मजबूत करण्याच्या दृष्टीने त्याच्या समोरच लागून असलेल्या डोंगरावर अर्जोजी यादव यांच्या देखरेखीखाली पावनगड उभारण्यात आला. यामुळे पन्हाळा आणखी भक्कम व भव्य झाला. या किल्ल्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटना जोडलेल्या आहेत. मराठा इतिहासापुरता विचार करता स्वराज्यातील अनेक महत्त्वाच्या लढायांचा आणि प्रसंगांचा मूक साक्षीदार आहे पन्हाळा.



## सिद्दी जोहरचा वेढा आणि पावन खिंडीची लढाई


१६५९ मध्ये कोल्हापूर, पन्हाळासोबतच दक्षिण कोकणचा प्रांत छत्रपती शिवाजी महाराज यांनी जिंकल्यानंतर आदिलशाही दरबारामध्ये एकच गोंधळ उडाला. अशा वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही दरबाराने सिद्दी जोहर या हबशी सेनापतीची नेमणूक केली. सिद्दी हा अफझलखानाइतकाच क्रूर आणि धूर्त म्हणून प्रसिद्ध होता. त्याने मराठ्यांसोबत युद्ध पुकारून मिरज मार्गे कोल्हापूर प्रांतावर हल्ला केला. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लढाईच्या तयारीने पन्हाळा सज्ज केला. सिद्दी जोहरने पन्हाळ गडाचा कडक वेढा घातला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना कैद करण्याची योजना आखली. पावसाळा सुरू झाला की, वेढा सैल होईल आणि आपण निसटून जाऊ हा मराठ्यांचा होरा सिद्दीने चुकीचा ठरवला आणि भर पावसातही वेढ्याचे काम जोराने चालवले. त्यामुळे गडावरील अन्न धान्य व युद्ध साहित्य कमी होत चालले. या सर्वांचा विचार करून छत्रपती शिवाजी महाराज यांनी वेढा फोडून निसटण्याचा बेत आखला. त्यासाठी त्यांनी शिवा काशिद या मावळ्याला छत्रपतींचा वेश करून सिद्दीच्या भेटीस पाठवले आणि आपण स्वतः वाघ दरवाजा उतरून विशाळगडच्या दिशेने कूच केले; पण शत्रूला बेसावध ठेवण्याची ही खेळी फसली आणि शत्रू सावध झाला. शत्रूने मराठा सैन्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी छत्रपतींसोबत रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजीप्रभु व फुलाजी प्रभु देशपांडे असे कसलेले योद्धे होते. त्यांनी महाराजांना सांगितले की, त्यांनी विशाळगड जवळ करावा आणि आम्ही खिंडीत शत्रूला अडवून धरतो. यानुसार रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभु व फुलाजी प्रभु देशपांडे यांनी घोड खिंड (पावन खिंड) येथे सिद्दीच्या सैनाला रोखून धरले. या खिंडीत झालेल्या लढाईमध्ये दुर्दैवाने हे सर्व वीर धारातीर्थी पडले. त्यांचे स्मारक आजही आपल्याला पांढरे पाणी येथे पाहावयास मिळते.

## पन्हाळा पुन्हा स्वराज्यात

सिद्दीच्या वेढ्यानंतर पन्हाळा हा पुन्हा आदिलशाहीकडे गेला. त्यामुळे कोल्हापूर प्रांतावरील मराठ्यांचे वर्चस्व धोक्यात आले. तसेच राजापूर बंदरातील व्यापारावरही त्याचा परिणाम झाला. त्यामुळे पन्हाळा पुन्हा स्वराज्यात आणण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केला. पुरंदरच्या तहानुसार विजापूर विरुद्धच्या मोहिमेत मोघलांना साथ देण्याचे कलम होते. त्यानुसार आदिलशाहीकडील पन्हाळा किल्ला जिंकण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज स्वतः पन्हाळ्यावर चालून गेले. सोबत सरसेनापती नेताजी पालकर होते; पण हा हल्ला अयशस्वी झाला. त्यानंतर १६७४ मध्ये हिरोजी फर्जंद या सेनापतीने अवघ्या ६० मावळ्यांनिशी रात्रीचा छापा टाकून पन्हाळा जिंकून घेतला आणि पन्हाळा पुन्हा स्वराज्यात समील झाला तो १७०१ च्या औरंगजेबाच्या पन्हाळ्यावरील स्वारीपर्यंत स्वराज्यात होता.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू आणि स्वराज्यातील अकल्पित घटना

१६८० मध्ये महाराष्ट्रावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला. शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा काळ झाला. यावेळी स्वराज्यात अनेक घडामोडी घडल्या. या सर्व घडामोडींचा साक्षीदार ठरला तो पन्हाळा. ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजा यांचा रायगड येथे मृत्यू झाला, त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज हे पन्हाळा मुक्कामी होते. रायगडावर कारभाऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांना दूर ठेवून छत्रपती राजाराम महाराज यांना गादीवर बसवण्याचा बेत रचला आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या अटकेचे आदेश रायगडावरून देण्यात आले. यावेळी मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो, समोजी दत्तो अशी मंडळी पन्हाळगडावर दाखल झाली. यावेळी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचा पक्ष घेऊन गडावर दाखल झालेल्या या मंडळींना अटक केली आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा गादीवर बसण्याचा मार्ग सुकर केला.



## औरंगजेबाची स्वारी आणि मराठ्यांची चिवट झुंज

संपूर्ण दक्षिण पादाक्रांत करून हिंद महासागरापर्यंत आपले साम्राज पसरवणे आणि मराठ्यांचा समूळ नाश करणे, या दोन उद्देशांनी औरंगजेब स्वतः मोठ्या फौजेनिशी दक्षिणेत डेरेदाखल झाला. छत्रपती संभाजी महाराज यांनी औरंगजेबास कडवी झुंज देऊन स्वराज्याचे रक्षण केले; पण दुर्दैवाने त्यांना अटक झाली आणि औरंगजेबाने त्यांची क्रूर हत्या केली. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वात

मराठ्यांनी लढा सुरूच ठेवला. जिंजीहून आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी पन्हाळा हा आपली राजधानी करून काहीकाळ येथूनच कारभार चालवला. यानंतर सन १७०० मध्ये राजाराम महाराज यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराणी ताराराणी यांनी लढा सुरू ठेवला. महाराणी ताराराणी यांच्या नेतृत्वात मराठा सरदारांनी मुघलांना चिवट झुंज दिली. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील सर्व किल्ले जिंकण्याची मोहीम स्वतःच्या नेतृत्वात सुरू केली. त्यावेळी १७०१ मध्ये औरंगजेबाने पन्हाळगडाला वेढा दिला. ही दुसरी वेळ होती पन्हाळगडाला वेढा पडण्याची. चिनकुलीच खान याने किल्ल्याला प्रथम वेढा दिला. मागाहून औरंगजेब पन्हाळ्याजवळ पोहोचला. यावेळी नारो शंकर यांनी वेढा सैल करण्याचा प्रयत्न केला. यावेळी चिनकुलीच खानासोबत त्यांची लढाई झाली. मराठ्यांनी तब्बल तीन महिने पन्हाळा लढवला. शेवटी पन्हाळ्याचा किल्लेदार त्र्यंबकजी याला मोठी रक्कम देऊन औरंगजेबाने पन्हाळा किल्ला ताब्यात घेतला. किल्ला खाली केल्यानंतर त्र्यंबकजी खेळणा अर्थात विशाळगडाकडे रवाना झाले. यावेळी परशुराम पंत प्रतिनिधी हे विशाळगडावर होते. त्यांनी त्र्यंबकजीने पन्हाळा औरंगजेबाच्या स्वाधीन केल्याबद्दल त्यांना बोल लावला.

## मराठ्यांची राजधानी पन्हाळा

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर थोरल्या शाहू महाराज यांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली. त्यामुळे मराठा मंडळामध्ये दुही निर्माण झाली. त्यावेळी थोरल्या शाहूंनी सातारा येथून राज्यकारभार सुरू केला, तर महाराणी ताराराणी यांनी पन्हाळा येथे राजधानी घोषित करून



कोल्हापूर संस्थानची स्थापना केली. यानंतर अनेक वर्ष कोल्हापूर संस्थानचा कारभार पन्हाळा किल्ल्यावरून चालत होता. याच किल्ल्यावर कोल्हापूर संस्थानातील सर्वात मोठी राज्यक्रांती घडून आली. १७१४ मध्ये कोल्हापूर संस्थानच्या संस्थापक महाराणी ताराराणी आणि त्यांचा पुत्र दुसरे शिवाजी यांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले आणि दुसरे संभाजी गादीवर बसले. यावेळी रामचंद्र पंत आमात्य, परशुराम पंत प्रतिनिधी यांनी संभाजी महाराज यांचा पक्ष घेतला. यानंतर १७१४ पासून ते १७३१ पर्यंत वारणेच्या तहापर्यंत महाराणी ताराराणी या याच पन्हाळा किल्ल्यावर कैदेत होत्या.

कोल्हापूरची राजधानी असलेल्या या किल्ल्यावर दरबार भरवला जात होता. याची साक्ष म्हणजे पन्हाळा किल्ल्यावर असलेले कचेरीचे वाडे. त्याशिवाय पन्हाळ्यावर सज्जा कोटी, छत्रपती राजाराम महाराज यांचे मंदिर, महाराणी ताराराणी यांचा वाडा यासह अनेक मंदिरे, पाण्याचे टाके आहेत. शिवकाळात तुपाच्या स्वरूपातही सारा गोळा केला जात होता याची साक्ष देणारी तुपाची विहीर आजही पावनगडावर पाहायला मिळते. युद्धकाळात जखमी सैनिकांवर उपचार करण्यासाठी या तुपाचा वापर करण्यात येई. १७८२ साली कोल्हापूर संस्थानचा कारभार कोल्हापूर शहरात हलवण्यात आला. त्यामुळे राजधानीचे पन्हाळ्याचे महत्त्व कमी झाले. यानंतर १८२७ मध्ये ब्रिटिशांनी पन्हाळा जिंकला.

पन्हाळा हा किल्ला बांधताना दीर्घकालीन लढाईसाठी सुसज्ज असा किल्ला उभारण्यात आला होता. समुद्रसपाटीपासून तब्बल २,७७२ फूट उंचीवर आणि ७ चौरस किलोमीटरच्या अफाट विस्तारावर उभा असलेला हा किल्ला, महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. पन्हाळा व पावनगड हे दोन्ही जोडकिल्ले खोल दरीच्या साहाय्याने एकमेकांशी जोडलेले आहेत. शिवकालीन लष्करी दृष्टिकोनातून या दोन किल्ल्यांची सांगड ही एक अपूर्व अशी संरक्षणयंत्रणा होती.

## रचना आणि वैशिष्ट्ये

किल्ल्यावर तीन प्रचंड धान्यकोठारे आहेत. त्यापैकी दोन बहामनी काळात बांधले गेलेले, तर तिसरे काळ्या दगडात बांधलेले कोठार मराठाकालीन आहे. या धान्य कोठाऱ्यांमुळे किल्ला दीर्घकाळ शत्रूच्या वेढ्यात टिकून राहू शकत असे. संपूर्ण डोंगराभोवती पसरलेली पन्हाळ्याची तटबंदी नागमोडी वळणे घेत डोंगरशिखरांवरून पुढे सरकते. त्यामध्ये अनेक गुप्त दरवाजे व मार्ग लपलेले आहेत. तीन दरवाजा, वाघ दरवाजा, चार दरवाजा असे भव्य दरवाजे या किल्ल्याला आहेत. पैकी चार दरावाजा अस्तित्वात नाही. तो पाडूनच ब्रिटिशांनी गडावर जाण्यासाठी मोटार रस्ता तयार केला आहे. त्याशिवाय आंधार बाव ही बारमाही विहीर या किल्ल्यात आहे. वास्तुरचनेचा अनोखा अविष्कार या ठिकाणी दिसून येतो. तीन दरवाजाच्या वरती गजाननाचे शिल्प कोरलेले आहे. तर वाघ दरवाजातून खाली जात असताना डाव्या हातास पद्म, मयूर व वरती असलेले गरूड शिल्प हा किल्ला प्राचीन असल्याची साक्ष देत आहेत. तटबंदीवर तब्बल ४० हून अधिक बुरुज उभे आहेत. त्यापैकी काळा बुरुज आणि पुसाटी बुरुज हे विशेष उल्लेखनीय आहेत.

**(विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.)**



# छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण आणि संस्कार

**अश्विनी पुजारी**

छत्रपती शिवरायांच्या शिक्षणाचा श्री गणेशा वयाच्या सातव्या वर्षी सुरु झाला होता. महाराजांची बुद्धी कुशल असल्यामुळे लिपीव्यवस्था त्यांनी जलद व उत्तमरीत्या आत्मसात केली. शिक्षक सांगण्यापूर्वीच ते पुढचा वर्ण लिहीत असत. त्यांच्या वेगवान शिकण्याने शिक्षक प्रभावित झाले. शहाजीराजांनी मंत्र्यांच्या मुलांसोबतच त्यांचे शिक्षण घडवून आणले. युद्धांत गुंतलेले असूनही शहाजीराजे पुत्राच्या जडणघडणीत जागरूक राहिले. भावी स्वराज्यासाठी योग्य प्रशिक्षण देणे हेच त्यांचे ध्येय होते.

शिवरायांचे शिक्षण शहाजीराजे व जिजाऊ यांनी नियोजनपूर्वक घडवले. मंत्र्यांच्या मुलांबरोबर शिकल्यामुळे त्यांच्याशी जिव्हाळा वाढला आणि भविष्यातील सहकार्य निश्चित झाले. शिवरायांची ग्रहणशक्ती विलक्षण होती; शिक्षक पहिला वर्ण शिकवीत असताना ते दुसरा लिहीत. ही अतिशयोक्ती नसून त्यांच्या जिज्ञासेमुळे आई–वडिलांनीच पुढील अक्षरे शिकविली असावीत. सातव्या वर्षी त्यांनी लिपी झपाट्याने आत्मसात केली आणि बाराव्या वर्षी पुण्यास येईपर्यंत विविध विद्या शिकत राहिले. यावरून शहाजीराजांनी त्यांची सखोल तयारी करूनच त्यांना स्वराज्यकार्यास पाठविले, हे स्पष्ट होते.

सातव्या वर्षी लिपीचे ज्ञान घेतल्यानंतर बाराव्या वर्षी पुण्याकडे येईपर्यंत शिवरायांनी विविध विद्या व ग्रंथांचे अध्ययन केले असणार, हे स्पष्ट आहे. फक्त लिपी शिकून त्यांनी वाचन केले नाही, असे होणे शक्य नव्हते. जिजाऊ व शहाजीराजांनी त्यांना वाचनाची सवय लावली व साहित्य उपलब्ध करून दिले. लिपी झपाट्याने शिकणाऱ्या

शिवरायांच्या मनात ज्ञानलालसा तीव्र होती, हेही उघड होते.

शिवराय बारा वर्षांचे झाल्यावर शहाजीराजांनी त्यांना पुणे प्रांताचा प्रमुख नेमले. परमानंदानुसार, शहाजीराजांनी एका शुभदिनी शिवरायांना सैन्य, हत्ती-घोडे, पायदळ, विश्वासू अमात्य, प्रसिद्ध अध्यापक, ध्वज-बिरुदे, मोठा खजिना व अन्य सेवक देऊन पुण्याकडे पाठविले. त्यानंतर शिवराय राजवैभव आणि सैन्यसह कर्नाटकातून महाराष्ट्रात येऊन पुण्यात दाखल झाले.

शिवराय बाराव्या वर्षी पुण्यात आले, तेव्हा ते मनानेच स्वतंत्र राजे होते. शहाजीराजांनी त्यांना फक्त जहागिरी सांभाळण्यासाठी नव्हे, तर भविष्यातील स्वराज्याचा अधिपती बनविण्यासाठी पाठविले होते. पुण्यात येऊन शिवरायांनी प्रजेचे मन जिंकले, राज्यकारभार उभारला आणि स्वतः विविध विद्यांमध्ये प्रावीण्य मिळवले. युद्धकला, शास्त्रे, व्यायाम, वास्तू, ज्योतिष, गणित, शस्त्रविद्या, दुर्गविद्या अशा अनेक विषयांत ते निपुण झाले. त्यांच्या यशामुळे शिक्षक व साहाय्यक कृतार्थ झाले आणि महाराष्ट्र देशाचे नावही सार्थ ठरले.



परमानंदाने शिवरायांना 'चक्रप्रियकर' म्हटले असून, यातून त्यांचे चक्रवर्ती होण्याचे स्वप्न दिसते. पुण्यात ते तीन शक्तींनी-प्रभुशक्ती (दूरदृष्टी व कर्तृत्व), मंत्रशक्ती (सल्लागारांचा योग्य आधार) व उत्साहशक्ती (ऊर्मी व चिकाटी) युक्त होऊन आले. त्यामुळे ते मनाने आधीपासूनच स्वतंत्र राजा होते. पुढे त्यांनी राज्याच्या सात अंगांनी संपन्न असा कारभार सुरू केला. ज्यातून त्यांचे स्वतंत्र राजेपण हळूहळू



प्रकट झाले. शिवरायांना पुण्यात स्थायिक करण्याची तयारी शहाजीराजांनी केली होती; पण ते बंगळुरूच्या कारभारात अडकल्यामुळे शिवरायांबरोबर जाणे शक्य झाले नाही. त्यामुळे जिजाऊ एकट्याच शिवरायांसोबत होत्या, हा निर्णय संपूर्ण कुटुंबाचा द्रष्टेपणाने घेतलेला होता. शिवरायांचे शिक्षण सातव्या वर्षी सुरू झाले आणि बाराव्या वर्षापर्यंत बंगळुरूमध्ये सुरू होते. पुण्याकडे जाताना त्यांचे शिक्षण पूर्ण झाले नव्हते, म्हणूनच त्यांच्यासोबत अनेक अध्यापक पाठवले गेले. परमानंदाने 'अध्यापक' आणि 'गुरवः' हे शब्द बहुवचनात वापरले आहेत, म्हणजे वेगवेगळ्या विद्या शिकविणारे अनेक शिक्षक होते. येथील गुरू म्हणजे वेतन घेऊन शिकविणारे शिक्षक - लिपीपासून विविध विद्या शिकवणारे. 'जीवनदर्शन देणारे अध्यात्मिक गुरु' या अर्थाने नव्हे. त्यामुळे शिवरायांचे गुरू म्हणजे अनेक विषय शिकविणारे शिक्षक होते आणि त्यांची संख्या बरीच मोठी होती.

परमानंदांनी शिवाजी महाराज यांना 'अनुकूलप्रकृति' असे विशेषण वापरले आहे. राज्यकारभाराची जी सात अंगे आहेत, त्यांना प्रकृती म्हटले जाते. ती सात अंगे म्हणजे स्वत: स्वामी (राजा), अमात्य, सहस्र (मित्रराजे), कोष (खजिना), राष्ट्र (भूप्रदेश), दूर्ग (किल्ले) आणि बल (सैन्य) ही सात अंगे राज्याची प्रकृती होत. या सात अंगांत महाराज निपुण होतील, याची दक्षता शहाजी राजांनी घेतली होती.

शिवरायांच्या घडणीत आई जिजाऊ आणि शहाजीराजे यांचा थेट सहभाग होता. त्यांच्याकडूनच अनेक महत्त्वाच्या विद्यांचे शिक्षण शिवरायांना लाभले. उदाहरणार्थ, इंगितज्ञान ही विद्या त्यांना आईवडिलांकडून मिळाली. इंगितज्ञान म्हणजे हावभाव, देहबोली, अभिनय यांवरून मनातील विचार ओळखण्याची कला. शहाजी स्वतः इंगितज्ञ होते आणि जिजाऊंनाही ही विद्या अवगत होती. तसेच शस्त्रविद्या शिकविण्याचे कार्यही आई-वडिलांनीच केले.

शिवरायांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे श्रेय मुख्यतः आई-वडिलांच्या संस्कारांना, विविध शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि स्वतःच्या नैसर्गिक कर्तृत्वाला जाते.

*(संदर्भ : श्रीशिवभारत कवीन्द्र परमानंद)*

**(सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.)**



**अजय भोसले**

मनावर निराशेची जळमटं जमायला लागली की, शिवचरित्र हाती घ्यावे......सह्याद्रीच्या कडे-कपाऱ्यातून येणारे प्रतिध्वनी मनात, हृदयात, नसानसात भिनवून घ्यावे.....जाणता राजा...ज्यांचं संपूर्ण चरित्र म्हणजे एक स्फूर्तिदायक पोवाडा....जीवनाचे सार....त्यांचे चरित्रामृत देहात रूजवून घ्यावे, शिवधर्माने पावन व्हावे....

प्रबोधनकार ठाकरे म्हणतात. श्रीकृष्णाने गीता सांगितली अर्जुनाला; पण प्रत्यक्ष आचरणात आणून महाराष्ट्राचा राष्ट्रधर्म भगवद्गीतेत आहे, हे सप्रमाण सिद्ध केले छत्रपती शिवाजी महाराज यांनी. गीतेचे पांग पांडवांनी फेडले नाहीत. ते छत्रपती शिवाजी महाराज यांनी फेडले. अर्जुन कर्तव्य बजावताना विचलित झाला होता. महाराज नेहमीच कर्तव्यतत्पर असत. रयतेचं हित हाच त्यांचा धर्म होता. *कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन* हाच त्यांचा एकमेव मंत्र होता. म्हणजे कार्यरत राहा, कर्मयोगी व्हा. आयुष्याची दिशा मला शिवचरित्रात सापडते. माझ्यासाठी शिवचरित्र हा पवित्र ग्रंथ आहे. रयतेचं हित शिवधर्म आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचे अवलोकन केले की, एक गोष्ट ज्ञात होईल, ती अशी की, त्यांची दृष्टी विज्ञानवादी होती. एक ना अनेक उदाहरणांतून हे स्पष्ट होईल. त्यातले एक असे की, छत्रपती शिवाजी महाराज आपल्या बहुतांश मोहिमा अमावस्येच्या रात्री योजीत. तुम्ही आम्ही आजही असा दिवस जमेस घेण्याचा विचार करू शकत नाही. रात्रीच्या काळोखात शत्रूला हालचाली अवगत होत नाहीत, हे एक महत्त्वाचे कारण होते; परंतु त्या काळात मुहूर्त वगैरे अशा संकल्पना

वरचढ असताना यातून महाराजांचा विज्ञानवादी दृष्टिकोन, तर्कशुद्ध निर्णयक्षमता, स्वकर्तृत्वावरील दृढ विश्वास प्रतीत होतो.

सागरावर जाणे म्हणजे महापापम...हा त्यावेळी लोकांच्या मनात रुजलेला विचार...छत्रपती शिवाजी महाराज यांनी आरमारच उभे केले...तुम्ही तुमच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदाविल्या नाहीत, तर अज्ञानाच्या डबक्यात लोळत राहाल हेच सांगायचे होते त्यांना.

अजून एक उदाहरण, राजाराम महाराज जन्माच्या वेळी पालथे जन्माला आले. सगळे गंभीर. त्यावेळी मूल पालथे जन्माला येणे म्हणजे अपशकून मानला जाई. महाराज दैववादी नव्हते. ते म्हणाले, पुत्र पालथा जन्मला, तो पातशाही पालथी घालील. केवढी ही आयुष्याची सकारात्मकता. हीच सकारात्मकता आज दुर्दैवाने लोप पावत आहे. कारण शिवधर्माचे आचरण होताना दिसत नाही.

बहुजन समाज कुठल्यातरी निरर्थक कल्पनेत गुंतून राहावा, अशी समाजातील विद्वान लोकांची योजना असते. किंबहुना कुठलाही देश, राज्य मूठभर तर्कशास्त्र निपुण विद्वान मंडळीच नियोजित करत असतात. सामान्य माणसाची बुद्धी भावनेवर विसंबून असल्यामुळे भावनांना थोपटणाऱ्या आमिषांना तो लगेच बळी पडतो. डॉ. ज. रा. शिंदे म्हणतात, सांस्कृतिकदृष्ट्या श्रेष्ठ असलेल्या अल्पसंख्याकाचीच सत्ता स्माजावर चालत असते. किंबहुना ती चालत राहणे स्वाभाविकच आहे. जगाचा इतिहास तसा आहे. मग एकच पर्याय उरतो नव्या जगात नुसते साक्षीदार व्हा. नाहीतर सामील व्हा. ज्ञानाची कास धरा. महाराज हेच तर सांगू पाहत होते.

# महाराज आज तुम्ही असते तर...

राज्यकारभाराची भाषा....एक गुंतागुंत मनात निर्माण होते. वैश्विक स्तरावर इंग्रजीचं प्राबल्य...काय करायचं? हट्टाने तोडकं मोडकं इंग्रजी झाडता. अनेक अहवाल म्हणतात....कुठल्याही गोष्टीचं आकलन होण्यासाठी शिक्षण मातृभाषेत झालं पाहिजे. मातृभाषाच अंगात मुरवली नाही, तर अन्य भाषेवर प्रभुत्व कसं प्राप्त होणार? इथेही माझ्या राजांची दूरदृष्टी पाहा. त्यावेळी राज्यकारभाराची भाषा फारशी होती. रयतेची मराठी. जर आपला राज्यकारभार आपल्या भाषेत नसेल, तर तो रयतेला आपला कसा वाटेल? राजांनी रयतेसाठी प्राकृतात म्हणजे मराठीत राज्यकारभार सुरू केला. याचा अर्थ राजांना अन्य भाषा अमान्य होत्या असे नाही. का वाटणार नाही रयतेस ते आपले राज्य. केवढा सूक्ष्म विचार. आज काळानुसार इंग्रजीचा अभ्यासही करावयासच हवा. तसेच जमतील तितक्या भाषा....ज्ञान...यात कोणताही संदेह नाही. महाराजांनी त्या काळातही ज्ञानाची साधने मोजकी असताना अंगीकारलेली दृष्टी विज्ञानवादी, तर्कशुद्ध होती. आज तर सर्व साधने तुम्हास उपलब्ध आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतकऱ्यांसाठी महसुलाची नवीन पद्धत आणली. दुष्काळ असेल तर सारा नाही उलट मदत मिळेल...हे वतनदारी व्यवस्थेने पिचलेल्या जनतेला नवीन होते. त्यांच्या आयुष्याला ही एक वेगळी सकारात्मक दिशा होती. मग माणसं का नाही जीव लावणार? शिवा न्हावी, बाजीप्रभू, मदारी...मेहतर...किती नावं घ्यावीत. महाराज धर्मनिष्ठ होते. धर्मद्वेष्टा नव्हते. ते श्रद्धाळू होते. अंधश्रद्धाळू नव्हते. कुणाजवळही दैवी देणगी, सामर्थ्य नसतं. परिश्रम, कर्तव्य याच्या जोरावर ध्येय गाठता येतं, याची त्यांना जाणीव होती, हे त्यांनी वेळोवेळी आपल्या कृतीतून सिद्ध केलं. ते प्रवचनकार नव्हते, कर्मयोगी होते. असुरक्षितता जाणवायला लागली की, समाजगट एखाद्या प्रभावी विचारधारेत सामील होतो. त्या वेळी समाजाला सामाजिक सुरक्षा नव्हती. ज्यावर विश्वास ठेवायचा तो नेताही तितकाच मातब्बर, आपला वाटायला हवा. त्यांचं कार्य आपलं वाटायला हवं. तसं रयतेला वाटत होतं. यातच समर्पणाच्या प्रेरणा प्रतीत होतात.

राजे केवळ दैववादी असते, तर उभं राहिलं असतं का रयतेच राज्य? त्यासाठी धर्म, जाती, वंश या पलीकडे जाऊन समानतेच्या धाग्यात सर्वांना गुंफावं लागतं. दृष्टी व्यापक करावी लागते. रयतेचा विश्वास संपादन करावा लागतो. हे सर्व माझ्या राजांनी कुठली घटना, प्रसंग, उदाहरण समोर नसताना रयतेप्रति असलेल्या आंतरिक प्रेमातून केलं. मग तुम्ही का जातिभेदाच्या बेड्यात अडकता. माझा तुम्हाला पुन्हा प्रश्न आहे. तुम्ही शिवचरित्र हृदयात रुजवलं का? वाचणं आणि रुजवणं दोन भिन्न बाबी आहेत. महाराजांची समाधी शोधून शिवजयंती सुरू करणाऱ्या, पोवाड्यातून स्फूर्ती देणाऱ्या महात्मा जोतिराव फुले यांचा मी ऋणी आहे. समानतेचे हक्क मिळवून देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मी ऋणी आहे.

आज हे का आठवावं. आजच्या आधुनिक युगातही कर्मवादापेक्षा दैववादाचं वाढलेलं स्तोम पाहून महाराजही दुःखी झाले असते. महाराज आज तुम्ही आज असते, तर तुमच्या करड्या शिस्तीने, तर्कशुद्ध, विज्ञानवादी भूमिकेतून आजच्या आपत्तीवर उपाय योजले असते. महाराजांचा इतिहास आम्ही तुम्हासी काय सांगावा....तो तर तुमच्या नसानसातून वाहतो आहे. महाराजांच्या हाकेला ओ देणारे मावळे तुम्हीच आहात. या भूमीत जन्मला तो या भूमीचा...त्यासी महाराजांनी आपले केले. मग ते मावळे का नाही आपल्या राजांवर जीव ओवाळणार. तुम्ही महाराजांचे सच्चे मावळे आहात. तुम्ही धर्म,जाती, भेद याच्या पलीकडे जाऊन कार्य कराल. सतत ज्ञानाची कास धराल. ज्ञानाच्या कक्षा रुंदावाल. कोणत्याही आपत्तीचे महाराजांनी आखून दिलेल्या शिस्तीत पालन कराल. शिवधर्माचे पालन कराल. याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

स्वामी विवेकानंद म्हणतात, उठा कामाला लागा, हे जीवन आणखी किती दिवस टिकणार आहे. जन्माला आलाच आहात, तर काही महत्त्वपूर्ण कार्य करून जा; नाहीतर तुमच्यात आणि वृक्ष- पाषाणात फरक तो काय? हे सांगण्याच्या कितीतरी शतके आधी छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांनी महत्त्वपूर्ण कार्य इतिहासाच्या पानावर कोरून ठेवले आहे. आज तोच इतिहास महाराजांचे मावळे आपल्या औदार्यातून नव्याने उभा करतील. शिवधर्माचा, माझ्या शिवबाचा...!

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**



# युवकांच्या हातात स्वराज्याचा वारसा

**सचिन अडसूळ**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले हे मराठा साम्राज्याचे प्रतीक आणि भारतीय इतिहासाचा अभिमान आहेत. या किल्ल्यांचे पावित्र्य राखणे, त्यांचा ऐतिहासिक ठेवा जपणे आणि पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन देणे ही प्रत्येक पर्यटकाची जबाबदारी आहे. विशेषतः युवकांनी यात सक्रिय सहभाग घेऊन किल्ल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशामुळे १२ किल्ल्यांचे महत्त्व अधिकच अधोरेखित झाले आहे. प्रत्येक पर्यटकाने स्वराज्याच्या या वारशाचा आदर करून छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाच्या आठवणी जपाव्यात आणि पर्यावरणपूरक भेट देऊन या किल्ल्यांचे सौंदर्य आणि पावित्र्य कायम ठेवावे. गडकिल्ले हे केवळ पर्यटनस्थळे नाहीत, ते आपले सांस्कृतिक वैभव, इतिहासाचे जिवंत दस्तऐवज आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी सोळाव्या शतकात मराठा साम्राज्याची स्थापना केली. ज्याचा पाया त्यांनी किल्ल्यांच्या रूपाने घातला. तोरणा, राजगड, रायगड, सिंहगड, पन्हाळा, लोहगड, प्रतापगड यांसारख्या किल्ल्यांनी मराठ्यांच्या स्वराज्याच्या स्वप्नाला बळ दिले. रायगडावर १६७४ मध्ये झालेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील एक मैलाचा दगड आहे. या किल्ल्यांवरून मराठ्यांनी मुघल, आदिलशाही आणि इतर परकीय सत्तांविरुद्ध यशस्वी लढा दिला. यातील प्रत्येक किल्ल्यामागे एक कथा आहे. अफझलखानाचा वध, पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका, तानाजी मालुसरे यांचे सिंहगडावरील बलिदान या सर्व घटना या किल्ल्यांना पवित्र बनवतात. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत १२ किल्ल्यांचा समावेश, हा त्यांच्या वैश्विक महत्त्वाचा पुरावा आहे. हे किल्ले केवळ दगडी बांधकाम नाहीत, तर आपल्या धैर्य, रणनीती आणि स्वातंत्र्याच्या जिद्दीचे प्रतीक आहेत. त्यामुळे, या किल्ल्यांचा आदर राखणे आणि त्यांचे ऐतिहासिक मूल्य जपणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

गडकिल्ले यांचा आज उपयोग मुख्यतः पर्यटनासाठी होतो. आठवड्याच्या शेवटी 'ट्रेकिंग', 'कॅम्पिंग', 'फोटोग्राफी'साठी गडांवर गर्दी उसळते. अनेकदा ही गर्दी उत्साहाने भरलेली असते; पण त्याचबरोबर काही बेफिकिरीने वागणाऱ्या लोकांकडून गडांचे नुकसानही होत आहे. शिवरायांचे नाव घेत गड चढणारे अनेकदा गडावर पोहोचल्यावर त्याच जागेचा अनादर करतात. प्लास्टिक कचरा टाकतात, दगडी भिंतींवर प्रेमाची कोरीव नावे लिहितात, मद्यप्राशन करतात, नको ती गाणी लावतात आणि इतिहासाच्या पवित्र जागांना 'फन डेस्टिनेशन'मध्ये

रूपांतर करतात.

ज्या वास्तूंनी आपल्याला शौर्य, त्याग, निष्ठा आणि राष्ट्रप्रेम शिकवलं, त्याच वास्तू अस्वच्छ झालेल्या कशा चालतील. अशा वेळी युवकांनी पुढे येणं ही काळाची गरज आहे. कारण युवक म्हणजे देशाचं भविष्य. त्यांच्याकडे जाणीव असेल, तर परंपरा टिकतात; त्यांच्याकडे दृष्टी असेल, तर वारसा जपला जातो आणि त्यांच्याकडे इच्छाशक्ती असेल, तर इतिहासाची मूळ ओळख पुन्हा उजळून निघते. छत्रपती शिवाजी महाराज हे युवकांसाठी केवळ प्रेरणास्थान नसून, आचारधर्मही आहेत. त्यांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी स्वराज्याचं स्वप्न पाहिलं आणि आयुष्यभर त्यासाठी लढा दिला. गड हे त्यांच्या स्वप्नांची मूर्तरूपे होती. आज जर आपण त्यांच्या गडांवर जात असू, तर गडावर पाऊल ठेवताना, प्रत्येक भिंतीला हात लावताना, त्या मातीचा सुगंध घेताना आपल्याला मनातल्या मनात शिवरायांना नमावं वाटतं. कारण ही ती भूमी आहे जिथे त्यांनी शत्रूला नामोहरम केलं, जनतेला सुरक्षित ठेवलं आणि स्वराज्याची मशाल पेटवली.



या किल्ल्यांचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची किंवा पुरातत्त्व खात्याची नाही, तर प्रत्येक पर्यटकाची, विशेषतः युवकांची आहे. आजच्या तरुण पिढीला सोशल मीडियासारख्या शक्तिशाली माध्यमांमुळे मोठी संधी आहे. त्यांनी या किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि त्यांचे संरक्षण का आवश्यक आहे, याबाबत जागरूकता निर्माण करावी. गेल्या काही वर्षांत अनेक युवकांनी या दृष्टीने सकारात्मक पावलेही उचलली आहेत. 'फोर्ट क्लिनिंग ड्राईव्ह', 'गडसंवर्धन मोहिमा', 'हेरिटेज वॉक', 'गड कथा सत्र' यांसारख्या उपक्रमांतून अनेकांनी गडांचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न केला आहे. आज प्रत्येक जिल्ह्यात, महाविद्यालयात आणि शाळेत 'गडसंवर्धन युवा गट' तयार करायला हवेत. प्रत्येक गडाला संरक्षक युवा गट मिळाला, तर गडांचे भविष्य उज्ज्वल होईल. गडकिल्ल्यांचा समावेश जागतिक वारसास्थळ यादीत झाला ही एक मोठी जबाबदारी आहे. कारण आता ही ठिकाणं जगभरातून पाहिली जाणार आहेत. आपला वारसा आपण जपलेला आहे का, आपली संस्कृती आपण टिकवली आहे का, याचं उत्तर याच ठिकाणी सापडणार आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी युवकांचं योगदान केवळ आवश्यकच नाही, तर अपरिहार्य आहे.

गडांवर शिस्तीत जाणं, आरडाओरडा टाळणं, ध्वनी प्रदूषण रोखणं, दगडांना इजा न पोहोचवणं, पवित्र स्थळांवर आदर राखणं हे सर्व लहान वाटणारे; पण मोठ्या परिणामांची कृती आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधील जैवविविधता आणि किल्ल्यांवरील नैसर्गिक संसाधने, स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. युवकांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, पुनर्वापरायोग्य साहित्य वापरावे आणि कचरा परत आणण्यासाठी पिशव्या बाळगाव्यात. किल्ल्यांवर पायी चालणे किंवा सायकलिंग करणे यासारख्या पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केल्यास प्रदूषण कमी होईल आणि नैसर्गिक संतुलन राखले जाईल. याचबरोबर किल्ल्यांच्या आसपास राहणाऱ्या स्थानिक समुदायांचा आदर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्थानिक व्यावसायिकांकडून अन्न, मार्गदर्शक सेवा किंवा स्मरणिका खरेदी करून युवकांनी स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ द्यावे. स्थानिकांच्या परंपरा आणि जीवनशैली यांचा मान ठेवावा. अशा छोट्या गोष्टींमधून स्थानिक समुदाय आणि पर्यटक यांच्यातील बंध दृढ होतात.

युवकांनी किल्ल्यांचा इतिहास आणि स्थापत्य यांचे संशोधन करावे. प्रत्येक किल्ल्याचे वेगळे वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ, रायगडावरील बाजारपेठ, हिरकणी बुरूज किंवा लोहगडावरील विंचुकडा या वैशिष्ट्यांबद्दल जाणून घेऊन त्यांचे महत्त्व इतरांना सांगावे. सोशल मीडियावर किल्ल्यांचे फोटो, व्हिडिओ आणि माहिती शेअर करून जागरूकता निर्माण करता येईल. युवकांनी किल्ल्यांवरील स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी व्हावे, ज्यामुळे कचरा हटवला जाईल आणि किल्ल्यांचे नैसर्गिक सौंदर्य टिकेल. स्थानिक प्रशासनाला डागडुजीसाठी मदत करणे किंवा पुरातत्त्व खात्याशी सहकार्य करणे यासारख्या उपक्रमांमधूनही युवकांचे योगदान महत्त्वाचे ठरेल. स्वराज्याच्या या अमूल्य वारशाला खऱ्या अर्थाने सन्मान देत आणि पुढच्या पिढ्यांसाठी तो जतन करत प्रत्येक युवकाने हे कार्य आपल्या हाती घ्यावे, ही इच्छा.

**(जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.)**

# शिवराज्याभिषेक दिन
# मराठा साम्राज्याचा गौरवशाली अध्याय

**युवराज पाटील**

६ जून १६७४ – हा दिवस महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेलेला एक विलक्षण क्षण होता. याच दिवशी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक संपन्न झाला आणि एक सार्वभौम हिंदवी स्वराज्य जन्मास आले.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक हा केवळ एका राजा किंवा सरदाराचा सत्तारोहण सोहळा नव्हता; तर हा होता रयतेच्या राज्याचा उद्घोष – शतकानुशतकं परकीय आक्रमणांनी आणि जातीय विषमतेने पिचलेल्या समाजाच्या पुनर्जन्माचा क्षण.

## वैभवशाली सिंहासन

सभासद बखर सांगते की, रायगडावरील राज्याभिषेक दालन हे परंपरेनुसार शुभ शकुन चिन्हांनी सजलेले होते. राज्याभिषेकासाठी खास तयार करण्यात आलेल्या सिंहासनाचे वर्णन करताना बखरीत ३२ मण सोन्याचे सिंहासन असा स्पष्ट उल्लेख आहे.

तेव्हा सोन्याच्या वजनाचे प्राचीन परिमाण आणि त्याचे आधुनिक रुपांतरण असे आहे :–

१ शेर = २४ तोळे

१ तोळा (जुना) = ११.७५ ग्रॅम

१ शेर = २४ x ११.७५ = २८२ ग्रॅम

१ मण = १६ शेर = १६ x २८२ = ४५१२

म्हणजे सुमारे ४.५१२ किग्रॅ)

३२ मण = ३२ x ४५१२ = १४४३८४ ग्रॅम

(म्हणजे १४४.३८४ किग्रॅ सोनं)

आजची सोन्याची किंमत (सध्याच्या दराने)

सध्याचा बाजारभाव (सप्टेंबर २०२५)

१ तोळा = १,१६,००० रुपये

एकूण तोळे १४४३८४ x ११.७५ =१६९६५१२ तोळे

एकूण किंमत १६९६५१२ x १,१६,००० = १९६,७९५,३९२,००० रुपये

म्हणजे अंदाजित मुल्य (रुपये) १,९६७ कोटी ९५ लाख रुपये (जवळपास वीस हजार कोटी रुपयांच्या आसपास)

या सिंहासनाची किंमत आजच्या मापदंडाने थक्क करणारी आहे, परंतु त्याहून थोर होती ती रयतेच्या मनात त्या सिंहासनाला लाभलेली जागा! त्या काळी सिंहासन हे केवळ सत्ता नव्हे, तर सेवा, न्याय आणि स्वाभिमान यांचे प्रतीक होते.

## दुमदुमलेला रायगड आणि ऊर्जित भारतवर्ष

राज्याभिषेक प्रसंगी रायगड किल्ला विविध तालवाद्यांच्या निनादाने, शंखध्वनी, तुर्यनादांनी, जयजयकारांनी आणि मावळ्यांच्या जल्लोषाने निनादला होता. अठरापगड मावळा आपल्या राजांचे दर्शन घेण्यासाठी आसुसला होता. सह्याद्रीच्या कुशीत गुंजणाऱ्या त्या घोषात एक नवा भारत, नवे राजकीय तत्त्वज्ञान आणि स्वराज्य जन्माला येत होते.

सभासद बखरीत उल्लेख आहे की, या सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी १२ मावळ प्रांतांतील प्रमुख वीरांना विविध पदे, मानपत्रे, रत्न, हत्ती, घोडे, वस्त्रे, शस्त्रे प्रदान केली. ही केवळ दानशूरता नव्हती, तर त्यागाची मान्यता आणि नेतृत्वाची प्रामाणिक पावती होती.



## रायगड – इतिहासाची जिवंत साक्ष

या दिवशी रायगडाने अनुभवलेले वैभव पुढील केवळ सहा वर्षेच अनुभवले. ३ एप्रिल १६८० रोजी याच रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांनी अंतिम श्वास घेतला.

रायगड हा केवळ एक किल्ला नव्हे, तो एक जिवंत इतिहास आहे. त्याच्या सिंहासनाने, दालनाने, दरबाराने आणि प्रत्येक पावलाने त्या काळातील न्याय, कणव, शौर्य आणि सन्मान अनुभवला आहे.

आजही जेव्हा आपण रायगडाच्या राजसिंहासनासमोर उभे राहतो, तेव्हा इतिहास डोळ्यांसमोर साकार होतो. ते सिंहासन केवळ सोन्याचं नव्हतं, तर स्वराज्याच्या अमोल मूल्यांनी झळाळलेलं होतं!

शिवराज्याभिषेक दिन म्हणजे अभिमान, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचा संदेश घेऊन येणारा दिवस. रायगडावर उभं राहून, महाराजांच्या आठवणीने आपण प्रेरणा घेतो आणि त्या सिंहासनात प्रजेसाठी लढणारा राजा पुन्हा एकदा आपल्या हृदयात जागृत होतो.

राजे, तुम्ही गेल्यापासून रायगड अजून झोपलाच नाही हो...

त्याच्या आठवणी, त्याची गर्जना आणि त्याचा आत्मा अजूनही त्या दरबारात, त्या वाऱ्यात, त्या कड्यांत जिवंत आहे.

*(**संदर्भ :** सभासद बखर, शिवचरित्र, ऐतिहासिक परिमाणे आणि सध्याचा सोन्याचा बाजारभाव – जून २०२५)*

**(जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.)**

# मराठी मुलखाचा पहिला अभियंता!

युवराज पाटील

*मानाचा मुजरा!!*

साल सहा एप्रिल १६५६ रोजी छत्रपती शिवरायांनी रायगड ताब्यात घेतला....सह्याद्रीच्या तटावरली उत्तम जागा.....सागरी दळणवळणास अतिशय जवळ (महाराजांचे आरमारावर विशेष लक्ष होते .... ज्याच्या हाती सागरी सत्ता आहे तो खरा मुलखाचा राजा ही गोष्ट हेरून राजांनी आग्र्याला जाण्यापूर्वीच आरमार बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सिंधुदुर्ग जलदुर्गाची पाया भरणी केली होती.)




म्हणून हा किल्ला राजधानीचे ठिकाण म्हणून बांधायला घेतला. हिरोजी इटाळकर (इंदुलकर) हे छत्रपती शिवाजी महाराजांचे बांधकाम प्रमुख होते. त्यांनी शिवरायांच्या स्वराज्याची राजधानी रायगडचे बांधकाम अत्यंत मजबूत असे बांधले. आताच्या कोणत्याही सिव्हिल इंजिनीअरला लाजवेल असे बांधकामकौशल्य त्यांच्याकडे होते. ते वडार समाजाचे होते. जेव्हा सिधुदुर्ग बांधावयाचा होता, तेव्हा वडार समाजातीलच सुमारे ५०० पाथरवट लोकांनी सिंधुदुर्गाचे बांधकाम केले असे सभासद बखर म्हणते. अगदी पुरातन काळापासून वडार समाज बांधकामध्ये, दगड फोडण्यामध्ये, दगडावरील नक्षीकामामध्ये कारागीर म्हणून प्रसिद्ध होता आणि सध्याही आहे. हिरोजी इटाळकर यांचे बांधकामकौशल्य पाहून छत्रपती शिवरायांनी त्यांना अनेक किल्ल्यांच्या बांधकामाचे काम दिले.

शिवराज्याभिषेकावेळेस खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनी हिरोजीस रायगडावरील इमारती, तळी, मनोरे, रस्ते, देवळे इत्यादी बांधकामे हाती दिले होते आणि त्याची जबाबदारी सोपविली होती. गड बांधण्याचे काम याने आपल्या देखरेखीखाली पूर्ण करून घेतले. त्यात त्यांनी वापी–कूप–तडाग, प्रासाद, उद्याने, राजपथ, स्तंभ, गजशाला, नरेंद्रसदन, बारा महाल अशा अनेक इमारती हिरोजींनी रायगडावर उभ्या केल्या. गड पाहिल्यावर छत्रपती शिवाजी महाराज बेहद्द खूश झाले आणि त्यांनी हिरोजीला सांगितले की, या गडावर कोणत्याही एका ठिकाणी तू तुझे नाव लिहावे आणि तुमच्या स्मृती जतन कराव्यात. म्हणूनच त्यांनी पायरीवर आपले नाव कोरले आणि त्यात लिहिले की, हिरोजी इटाळकर महाराजांच्या सदैव तत्पर सेवेमध्येच असेल.


या आपल्या शिलालेखात त्यांनी सेवेठायी तत्पर हिरोजी इंदुलकर. असे म्हणून आपण महाराजांचे निस्सीम भक्त आणि सेवक आहोत हेच दाखवून दिले. अशा स्वराज्यातील पहिल्या स्थापत्य अभियंत्यास....स्थापत्य अभियंता दिनी मानाचा मुजरा!!

**(जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.)**

## शिवकालीन चलन

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात व्यवहारासाठी कोणते चलन असावे हा प्रश्न नेहमी पडतो. सर्वसाधारण इतिहासाच्या संदर्भात खरेदी विक्री करण्यासाठी दररोजच्या व्यवहारासाठी वापरले जाणारे तांब्याचे नाणे सर्वश्रुत आहे. काही विशिष्ट प्रसंगी सोन्याची नाणीही पाडली जात. शिवराई आणि होन अशी सर्वसाधारण नाणी असल्याचे आढळून येते. होनवर एका बाजूला श्री राजाशिव आणि दुसऱ्या बाजूला छत्रपती अशी अक्षरे होती. ही अक्षरे देवनागरी लिपित होती. त्या काळी राजव्यवहारात पारसी भाषा अस्तित्वात असताना आपल्या भाषेचा जाणीवपूर्वक वापर म्हणजे स्वराज्याच्या प्रेमाचा ज्वाजंल्य अभिमान दिसून येतो. या व्यतिरिक्त त्या काळात पुतळी, मोहर, टिपकी, इ. नाणीही अस्तित्वात होती. मराठा साम्राज्याची वेगळी ओळख प्रस्थापित करण्यासाठी या नाण्यावर मराठी लिपीचा वापर जाणीवपूर्वक केला गेला होता. ही नाणी तयार करणे हे स्वाभिमानी मराठा शासकाच्या राज्यत्वाचे आणि अधिकाराचे एक शक्तिशाली प्रतीक होते.*





# जिंजी : भारताचा अभेद्य किल्ला

जिंजीचा किल्ला, ज्याला 'भारताचा अभेद्य किल्ला' किंवा 'दक्षिण भारताची ग्रेट वॉल' असेही संबोधले जाते. हा तामिळनाडू राज्यातील विल्लुपुरम जिल्ह्यातील एक भव्य दुर्ग आहे. इतिहास, शौर्य आणि लष्करी कौशल्य यांचा संगम असलेला हा किल्ला मराठा साम्राज्याच्या इतिहासात विशेष स्थान राखतो.

## ऐतिहासिक महत्त्व

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७७ मध्ये त्यांच्या दक्षिण भारतातील मोहिमेदरम्यान हा किल्ला जिंकला. नंतर १६८९ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी रायगडावरून जिंजी येथे स्थलांतर केले आणि जवळपास नऊ वर्षे मराठा साम्राज्याची राजधानी इथे राहिली. यामुळे या किल्ल्याला स्वराज्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान मिळाले. जिंजीचा किल्ला तामिळनाडूच्या विल्लुपुरम जिल्ह्यात स्थित असून चेन्नईपासून सुमारे १६० कि.मी. अंतरावर आहे. पुडुचेरी शहराच्या जवळ असल्याने हा किल्ला आजही प्रवाशांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतो.

## किल्ल्याची वैशिष्ट्ये

जिंजीचा किल्ला हा तीन डोंगरांवर आणि एका सपाट प्रदेशावर उभारण्यात आला आहे.

**राजगिरी –** सर्वात उंच आणि भक्कम डोंगरकिल्ला.

**कृष्णगिरी –** धोरणी दृष्टिकोनातून महत्त्वाचा किल्ला.

**चंद्रगिरी –** किल्ल्याच्या संरक्षणात मदत करणारा महत्त्वाचा भाग.

या नैसर्गिक भौगोलिक रचनेमुळे किल्ला अभेद्य मानला जातो. उंच भिंती, बुरूज, पहारेकऱ्यांचे मनोरे, आणि गुप्त बोगदे या सर्व गोष्टींमुळे हा किल्ला रणनीतीदृष्ट्या अत्यंत मजबूत आहे.

## सांस्कृतिक आणि वास्तुशिल्पीय वैशिष्ट्ये

किल्ल्याच्या परिसरात मंदिरे, राजवाड्यांचे अवशेष, शिल्पकला आणि दगडांवरील नक्षीकाम दिसून येते. ही रचना त्या काळातील





कलात्मकता आणि धार्मिक भावनांचा उत्तम प्रत्यय देणारी आहे.

भारतीय पुरातत्त्व विभागाने जिंजी किल्ल्याला राष्ट्रीय महत्त्वाचे स्मारक म्हणून घोषित केले आहे. आजही हा किल्ला इतिहासप्रेमी, प्रवासी आणि संशोधकांसाठी प्रेरणादायी आहे. 'दक्षिणेचा जिंजी' हा मराठा स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचा साक्षीदार म्हणून उभा आहे.

तामिळनाडूच्या डोंगररांगा अंगावर पांघरून घेतलेल्या जिंजी किल्ल्याची भव्यता म्हणजे शौर्य, वैभव आणि दगडामध्ये कोरलेली अद्भुत वास्तुकलेची गाथा. हा ऐतिहासिक किल्ला केवळ प्राचीन वैभवाची कहाणी सांगत नाही, तर पराक्रम, शौर्य आणि सांस्कृतिक वारशाचे अमर प्रतीक म्हणून उभा आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये नोंद झालेला जिंजी किल्ला म्हणजे लष्करी कौशल्य, धोरणी बांधकाम आणि अपराजेय शक्तीचे मूर्तिमंत उदाहरण. कधी काळी, मराठे, मुघल ते इंग्रज अशा अनेक सत्ताधीशांच्या नजरेत हा अभेद्य दुर्ग होता. तीन टेकड्यांवर पसरलेला हा किल्ला अभेद्य मानला जात असे.

किल्ल्याच्या भिंती आकाशाला भिडलेल्या प्रहरींसारख्या भासतात जणू त्यांना उभारणाऱ्या शिल्पकारांचे कौशल्यच माणुसकीला अभिमान वाटावा असे दिसते. आतमध्ये शिरताच प्राचीन काळाचा जिवंत अनुभव मिळतो. भग्नावस्थेत उभ्या असलेल्या राजवाड्यांचे अवशेष, देवदेवतांना अर्पण केलेली मंदिरे, त्यांवरील सूक्ष्म शिल्पकाम आणि देखणी नक्षीकामं हे सर्व त्या काळातील कलात्मकतेचे आणि भक्तिभावाचे प्रतीक असल्याचे जाणवते. राजवाड्यांचे आणि मंदिरांचे अवशेष एकेकाळी जीवनाने गजबजलेले होते. उत्सव, पूजा–अर्चा, गडबडीत भरलेले ते ठिकाण आज शांत आणि विराण दिसत असले तरी त्यातील कोरीव देवदेवता अजूनही त्या काळाच्या आध्यात्मिकतेची साक्ष देत असल्याचा भास होतो.

साहसप्रिय प्रवाशांसाठी जिंजी किल्ल्यातील भूमिगत मार्ग आणि गुप्त बोगदे विशेष आकर्षण ठरणारे आहे. वेढ्याच्या काळात सैनिकांनी सुटकेसाठी यांचा उपयोग केला. काळोख्या आणि गुंतागुंतीच्या या मार्गांतून चालताना जणू त्या काळाच्या रहस्यात आपण स्वतः शिरतो.

भव्य भिंतींची वळणे, उंच पहारेकऱ्यांचे मनोरे, लष्करी गरजेनुसार उभारलेले कंगोरेदार हे सर्व पाहताना लढाया, रणशिंग आणि पराक्रमाच्या गाथा डोळ्यांसमोर तरळतात. मनोऱ्यांवरून दिसणारे विस्तीर्ण डोंगर, हिरवळ आणि परिसर मन मोहून टाकतात.

जिंजी किल्ल्याचे सौंदर्य केवळ दगडामध्ये नसून त्याच्या सभोवतालच्या निसर्गदृश्यातही दिसून येते. हिरव्या डोंगरांनी वेढलेले हे दुर्गवैभव खऱ्या अर्थाने इतिहासप्रेमी, प्रवासी आणि सौंदर्यरसिकांसाठी तीर्थक्षेत्र आहे.

भारतीय पुरातत्त्व विभागाने राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकाचा दर्जा दिलेला हा किल्ला येणाऱ्या पिढ्यांसाठी अभिमानाचे प्रतीक राहणार आहे.

*संदर्भ : https:www. tamilnadutourism.tn.gov.in*

# शिवप्रेमी अजय भोसले यांनी साकारलेला गडकिल्ला.



शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही, तर शिवाजीमहाराज ही आजच्या तरूण पिढीसाठी ऊर्जा आहे; जिचा वापर हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होऊ शकतो !

– स्वामी विवेकानंद

भारताला जर स्वातंत्र्य मिळवून द्यायचं असेल तर एकच पर्याय आहे, शिवाजी महाराजांप्रमाणे लढा !

– नेताजी सुभाषचंद्र बोस


जर शिवाजी महाराज हे इंग्लंडमध्ये जन्माला आले असते तर आम्ही पृथ्वीवरच काय पण परग्रहावरही राज्य केले असते !

– लॉर्ड माउंटबॅटन, इंग्लंड

महाराष्ट्र जनपदस्तदानीं
तत्समाश्रयात् । अन्वर्थतामन्वभवत्
समृद्धजनतान्वित:।।
(शिवाजी महाराजांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील जनता समृद्ध झाली आणि 'महाराष्ट्र' हे नाव सार्थक केले.)

– श्री परमानंद, शिवभारत अध्याय १०वा

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन




# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणेतून मिळेल विकासाची नवी दिशा!

- चौंडी येथील स्मृतिस्थळाचा तीर्थस्थळ विकास आराखड्यात समावेश, यासाठी ६८१.३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ७ तीर्थस्थळांचा विकास प्रस्तावित
- ऐतिहासिक जलस्रोतांच्या जतन व संवर्धनासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ३४ जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करून इतिहासाला नवसंजीवनी देण्यात येणार
- अहिल्यानगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अत्याधुनिक रुग्णालयाची स्थापना करण्यात येणार; १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय लवकरच उभारण्यात येणार
- धनगर समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृह योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे करण्यात येणार
- नारी शक्तीचा जागर करण्यासाठी, महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' आणि 'आदिशक्ती पुरस्कार योजना' राबविणार
- अहिल्यानगर येथे मुलींसाठी विशेष शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणार
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित बहुभाषिक चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार

पुण्यश्लोक
**अहिल्यादेवी होळकर**
यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन !







एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in | MaharashtraDGIPR | MahaDGIPR











# लिहिते व्हा...

## आपलं मंत्रालय



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई–मेलवर पाठवावेत.

**आपलं मंत्रालय**

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
ई–मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**
**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**